सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर,ता.बार्शिटाकळी जि.अकोला.
द्वारा संचालित

**नॅक,बंगलोर द्वारा थर्ड सायकल मानांकित महाविद्यालय,श्रेणी 'बी'**

वार्षिकांक

# मोतीपुष्प









## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

### पिंजर ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

2019-2020
2020-2021



शिवजयंती साजरी करतांना मा.प्राचार्य व्ही.सी.खारोडे व रासेयो प्रमुख प्रा.आर.एन.गावंडे तथा प्राध्यापक वृंद -कर्मचारी



रासेयो द्वारा आयोजित राष्ट्रीय एकात्मता वकृत्त्व स्पर्धेत समारोपीय भाषण करतांना प्राचार्य डॉ.व्ही.सी.खारोडे



सांगली,कोल्हापूर पुरग्रस्तांना महाविद्यालयातर्फे मदत निधी संकलन




राष्ट्रीय एकात्मता वकृत्त्व स्पर्धेचे सुत्रसंचालन : कु.राधिका सामुद्रे




युवा माहिती दूत कार्यशाळेची माहिती देतांना श्री राजु सवाईकर (समन्वयक)




विद्यार्थ्यांला पारितोषिक वितरण करतांना प्राचार्य तथा पोलीस अधिकारी




ऑनलाईन प्रणालीद्वारे संविधान दिन साजरा करतांना प्राचार्य डॉ.व्ही.सी.खारोडे



मतदार जनजागृती अभियानात सहभागी महाविद्यालय प्राध्यापक वृंद

# ।। आमचे प्रेरणास्थान ।।



(जन्म २२ जून १९२२ – मृत्यू ११ मार्च २००५)

**स्व.मोतीरामजी उदेभानजी उपाख्य भाऊसाहेब लहाने**

संस्थापक अध्यक्ष

सुशिक्षण प्रसारक मंडळ,पिंजर

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर
## ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

# महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| १) ........... | पदसिध्द अध्यक्ष |
| २) ....... | सचिव |
| ३) डॉ. विनोद चिं.खारोडे | प्राचार्य,पदसिध्द सचिव |
| ४) डॉ.पंकज एम.तायडे | अर्थशास्त्र विभाग प्रमुख |
| ५) डॉ.अनिल खु.ठाकरे | अध्यापक प्रतिनिधी |
| ६) प्रा.रामकृष्ण एन.गावंडे | अध्यापक प्रतिनिधी |
| ७) डॉ. रेखा एस.काळबांडे | महिला अध्यापक प्रतिनिधी |
| ८) श्री विलासराव देशमुख | शिक्षण प्रतिनिधी |
| ९) श्री. विजय गुल्हाने | उद्योग प्रतिनिधी |
| १०) श्री दिपक सदाफळे | समाजसेवक |
| ११) प्रा.अमोल इंगोले | संशोधन -माजी विद्यार्थी |
| १२) डॉ.मनोज के.फडणीस | अंतर्गत गुणवत्ता हमी समिती |
| १३) श्री डी.डी.बाकल | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |
| १४) .................. | विद्यार्थी परिषद सचिव |
| १५) ................. | विद्यार्थी परिषद सभापती |

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्यांचे मनोगत | | १ |
| २) | ग्रंथालय आणि वर्तमान पत्र | प्रा.डॉ.रेखा सुखदेव काळबांडे | ३ |
| ३) | ग्रंथालयाचा अहवाल | | ५ |
| ४) | मराठी भाषा नष्ट होईल ही भीती अनाठायी | प्रा.डॉ.अशोक व्ही.वाहुरवाघ | ६ |
| ५) | कोरोना-आर्थिक सामाजिक परिणाम | डॉ.पंकज तायडे | ८ |
| ६) | निर्वासित कामगार व शेतमजुरासंबंधी डॉ आंबेडकरांची भुमिका | | १२ |
| ७) | आसनांचा खेळाडुंच्या पायाच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामांचे चिकित्सक अध्ययन | नानासाहेब सपकाळ | १६ |
| ८) | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ | प्रा.सुनिल म.मनवर | १९ |
| ९) | Importance of Yoga and Pranayam | | २० |
| १०) | आदिवासी जमातीची उत्पत्ती | | २१ |
| ११) | अक्षर धन | श्री भाऊराव महल्ले | २३ |
| ११) | मेरा एन.एस.एस.एस का सफर ......... | कु.रोशनी संजय जयस्वाल | २४ |
| १२) | महाराष्ट्राचे राष्ट्र विकासात योगदान | दत्ता हनुमान सदाफळे | २५ |
| १३) | विसरत चालेला बाप | कु.भाग्यश्री बा.मुळे | २६ |
| १४) | बेटी की पुकार | कु.तेजस्विनी हातोलकर | २७ |
| १४) | न्याय मिळालाच पाहिजे | कु.रोहिणी नयन वाघमारे | २८ |
| १५) | बेटी बचाओ बेटी पढाओ | कु.मोनाली विनोद भेराने | ३० |
| १६) | खरी सरस्वती सावित्री | कु.दामिनी मुळे | ३० |
| १७) | स्त्री शिवाय माणूस अपूर्णच | मेघा घाडगे | ३१ |
| १८) | भुकेची आग | कु.आकांक्षा इंगळे | ३१ |

## अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख | लेखकाचे नांव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १९) | युवकांचे आदर्श छत्रपत्री शिवाजी | राहुल सावंत | ३२ |
| २०) | शेतकऱ्यांची व्यथा | कु.दिव्या गणेश राऊत | ३४ |
| २१) | शिक्षक म्हणजे कोण | कु.कोमल अंभोरे | ३५ |
| २२) | शेतकऱ्यांचे हाल | कु.दिपाली शिवहरी घाटोळकर | ३६ |
| २४) | माता –पिता आणि जीवन | कु.प्रगती सोनोने | ३७ |
| २५) | मुलींनी जगावे तरी कसे ? | कु.पुजा रामेश्वर काकड | ३८ |
| २६) | आई–वडील,शिवाजी पोवाडा | कु.पोर्णिमा सत्यविजय हागे | ३९ |
| २८) | आई | कु.हर्षा दादाराव सदांशिव | ४१ |
| २९) | मातृभूमिची शान | कु.शारदा नामदेव आसरे | ४२ |
| ३०) | स्त्रीजन्म म्हणोनी न व्हावे उदास | कु.पायल रामेश्वर राठोड | ४३ |
| ३१) | आयुष्यातील वळण | शिवा थाटे | ४४ |
| ३२) | जाती निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या | | ४५ |
| ३३) | पदवीदान समारंभ अहवाल | | ४६ |
| ३४) | वार्षिक नियोजन व कृती आराखडा | | ४७ |
| ३५) | विविध समित्यांचा कार्यभार | | ५३ |
| ३६) | विविध समित्यांचा कार्यभार | | ५५ |
| ३७) | खरा तो एकची धर्म | | ५६ |


### ‘‘ विद्या परम दैवतम् ’’

विद्या विना मती गेली । मती विना निती गेली ।।

निती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।।

एवढे अनर्थ एका अविद्येने केले ।

## प्राचार्यांचे मनोगत

**आ**मच्या भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेजचा हा पंधरावा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. आमचे महाविद्यालय ग्रामीण जनजीवनाशी नाते सांगणारे आहे. संचालक मंडळ,शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद,विद्यार्थी व भोवतालचे वातावरण हे ग्रामीण मातीशी इमान राखणारे आहे.ग्रामीण भागात उच्च शिक्षण-गुणवत्तापूर्ण देतांना काही मर्यादा येतात. मर्यादांवर मात करण्याचा प्रयत्न आमच्यातील सर्व घटक मनापासून करीत असतात. स्व.भाऊसाहेबांच्या पुण्यमय कृपा आशीर्वादाचे बळ आमच्या पाठीशी सदैव असतेच. त्यांच्याच आशीर्वादामुळे " विद्यार्थी " हा केंद्रबिंदू मानून आमची शैक्षणिक वाटचाल चालु आहे. १९९५ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाने नॅक बंगलोर द्वारा पहिली चाचणी स्व.भाऊसाहेबांच्या कृतिशील मार्गदर्शनाखाली उत्तमरित्या पार पाडली. २०१२ मध्ये नॅक समितीने पुन्हा आमच्या महाविद्यालयाचे परिक्षण केले. त्यावेळेस महाविद्यालयाला १९१ गुण प्राप्त झाले होते ' सी ' हा ग्रेड प्राप्त केल्यावर आम्ही पुनश्च कामाला लागलो.

सप्टेंबर २०१७ मध्ये आमच्या महाविद्यालयाला नॅक समितीने तिसऱ्या सायकलसाठी भेट दिली. सदर समितीच्या अध्यक्ष म्हणुन गुजरातचे डॉ.मोहिते सर होते तर समन्वयक हिमाचल प्रदेशच्या डॉ.रैना मॅडम होत्या. नॅक पिअर टीमचे सदस्य उत्तर प्रदेशातील डॉ.शगुन आनंद सर होते. सदर समितीने आमच्याग्रामीण भागातील महाविद्यालयाचे मनापासुन कौतुक केले. त्यांनी योग्य गुणांकन करून आमच्या महाविद्यालयाला २.११ गुणांसह आम्हाला ' बी ' श्रेणी बहाल केला.

आमचे महाविद्यालयचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत ,ग्रामीण भागातून तिसऱ्या नॅक सायकलसाठी पुढे आलेले एकमेव महाविद्यालय आहे. तिसरी सायकल पुर्ण करणाऱ्या विद्यापीठातील पहिल्या दहा महाविद्यालयात आमचे महाविद्यालय येते. ग्रामीण भागात गुणवत्ता टिकवितांना अनेक अडचणी येतात. प्राप्त परिस्थितीत गुणवत्ता टिकवुन ठेवण्याचा सदैव प्रयत्न आम्ही सर्वजण करतो. भविष्यात या महाविद्यालयातील विद्यार्थी हा देशाचा उत्तम नागरिक बनावा हे आमचे उद्दिष्ट आहे.त्यासाठी मला सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. मला हे पूर्णत : सहकार्य मिळेल ही खात्रीही आहे.

२०१७-१८ या सत्रापासून विद्यापीठाने कला शाखेमध्ये सेमिस्टर पध्दतीचा अवलंब केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही पध्दती अत्यंत जटील असून त्याचे विपरित परिणाम दिसून येत आहेत; तसेच चांगले परिणामही दिसतात. जसे की, मार्च-एप्रिल महिन्यातही विद्यार्थी -खास करून सजग विद्यार्थीनी महाविद्यालयात तासिकांसाठी उपस्थित असतात. ही खूप मोठी जमेची बाजू वाटते. संपूर्ण में

महिन्यात परीक्षा संपन्न होतील, ही सुध्दा आनंदाची बाब आहे. असे असले तरी मी सेमिस्टर पध्दतीच्या यशस्वीतेसाठी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

महाविद्यालयाचा हिरवागार व नयनरम्य परिसर, खेळाचे मोठे मैदान ,रनिंग ट्रॅक, परिपूर्ण इमारत , सुसज्ज ग्रंथालय, व्यायामशाळा ,संगणकीकृत कार्यालय, अनुभवी व ज्ञानसंपन्न प्राध्यापकवर्ग, तसेच ज्ञानप्रकाश कौशल्य विकास केंद्राद्वारा विद्यार्थ्यांना संगणक शिकण्याची अद्ययावत सुविधा,इंग्रजी संभाषणाचे धडे देणारे वर्ग व विविध सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन व उत्तेजन या आमच्या जमेच्या बाजू आहेत. परिसरात विशाल वृक्ष उभारण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. त्यासाठी आम्रवृक्ष,कडुवृक्ष,पिंपळवृक्ष,गुलमोहर व अशोकांच्या झाडांची लागवड आम्ही केली आहे. झाडांना पाणी उपलब्ध व्हावे म्हणून वेस्ट वॉटर मॅनेजमेंट, रेन वॉटर हार्वेस्टींग,नवीन बोअरची उभारणी ,ठिंबक सिंचन पध्दती आदींचा अवलंब आम्ही करतो. सर्वांचा समन्वयक प्रयत्नातून पर्यावरणास हातभार लावण्याचे सत्कर्म आम्ही करतो याचा आनंद वाटतो ' हिरवागार व स्वच्छ परिसर व विद्यार्थ्यांचे उत्साहाचे झरे ' हे आमचे शैक्षणिक ब्रीद आहे. सोबतच महाविद्यालयास अधिक समाजाभिमुख करणे हे अंतिम ध्येय आहे, त्यासाठी मला आपल्या सर्वांचे सहकार्य हवे आहे. आपण सहकार्य कराल ही आशा आहेच. सत्र २०१९-२० हे वर्ष संपुर्ण राष्ट्रासाठी खुप वेदना देणारे ठरले आहे. सदरच्या वर्षाने संपुर्ण अर्थकारण व समाजकरणाला खिळखिळे करुन टाकली आहे. शिक्षण क्षेत्र सुध्दा पालक व विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात प्रभावित झाला आहे. सन २०१९-२० , २०-२१ मध्ये झालेले नुकसान भरून काढणे अत्यंत कठीण असले. तरी सुध्दा आपण सर्वजण कठोर मेहनत करुन हे झालेले नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न करु अशी आशा व्यक्त करतो. आभासी शिक्षणाने ही उणीव भरून काढणे अशक्य असले तरी आपण सर्वजण सर्वोतोपरी प्रयत्नशील असू अशी मला

**डॉ.व्ही.सी.खारोडे**
**प्राचार्य**
**भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर**

# ग्रंथालय आणि वर्तमानपत्र

डॉ.रेखा सुखदेवराव काळबांडे

ग्रंथालय म्हणजेच वाचनाची आवड असणाऱ्यांची शिदोरीच ,सर्वच प्रकारचे वाचन साहित्य परंतु प्रथम स्थान वर्तमान पत्रालाच ,वर्तमान पत्र म्हणजेच दैनंदिन जीवनातील एक महत्वाची क्रिया ग्रंथालयामध्ये अनेक प्रकारची वाचन साहित्य असतात. जसे कथा,कांदबरी,चरित्र,आत्मचरित्र मासिक याचप्रमाणे अत्यंत महत्वाचा वाचनीय प्रकार म्हणजेच दैनिक वर्तमानपत्र. आधुनिक माध्यमांच्या युगातही वर्तमान पत्र अग्रगण्यच. आजही लोकांना सकाळचा पहिला चहा हा वर्तमानपत्राबरोबर घ्यायला आवडतो. ब्रिटीश राजवटीच्या काळामध्ये भारतीय पत्रकरितेचा उदय झाला. त्यांचा उद्देश हा वेगळा होता.पश्चात्य शिक्षणातून आपल्या समाजाला आधुनिकतेची ओळख करुन देण्याचे ध्येय हा त्यामागील उद्देश होता व्यावसायिक दृष्टिकोनातून पत्रकरिता सुरु झाली नव्हती.

बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी भाषेतील ,पहिले वर्तमानपत्र ' दर्पण ' सुरु केले व त्याचे नांव ही अगदी योग्यच होते, ' दर्पण ' दर्पण म्हणजेच आरसा,वर्तमानपत्र हे समाज जीवनाचा आरसा आहे. समाजात सामाजिक आर्थिक, राजकीय,शासकीय शैक्षणिक अशा विविध पातळीवर जे घडते त्याचे पडसाद वर्तमानपत्रात उमटतात. त्यामुळेच प्रत्येकाने वर्तमान पत्र हे वाचायलाच पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात गतीने इतर ही प्रसार माध्यमे आलीत, मात्र आजही वर्तमान पत्राचे अस्तित्व कायम आहे. आजही वर्तमान पत्र हे '' दिपस्तंभा'' सारखे दिमाखाने उभे आहे. शहरच नव्हे तर ग्रामीण भागापर्यंत वर्तमान पत्राचे जाळे पसरले आहे. ग्रामीण भागामध्ये गावाच्या चावडीवर बसून वर्तमान पत्रामधल्या बातम्याचा चर्चा होत असतात. गावाकडील मंडळीचा चर्चेचा विषय हा राजकारण तर असतोच त्याचबरोबर शेतमालाच्या हमी भाव.

आजच्या तरुण पिढीमध्ये जसे महाविद्यालयीन विद्यार्थी महाविद्यालयीन विद्यार्थी ग्रंथालयामध्ये सर्व प्रथम वर्तमान पत्राचेच वाचन करतात. कारण प्रत्येकाची गरज वर्तमान पत्राद्वारेच पूर्ण होवू शकते. जसे नोकरी विषयक संदर्भ, रिकाम्या पदाच्या जागा असो कि, जागा खरेदी विक्री असो, कोणत्या टॉकिजमध्ये कोणता सिनेमा लागला आहे ते असो, नवनवीन माहिती, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन पर माहिती, शब्दकोडे अभिनेता बद्दल गॅसिपिंग असे अनेक विषय हे वर्तमान पत्राद्वारेच आपल्याला वाचायला मिळतात. स्त्रियांकरिता वेगवेगळ्या वर्तमानपत्रामधील पुरवण्या,तसेच युवकांसाठी ,बालकांसाठी, वृध्दासाठी भरभरुन माहिती ही वर्तमानपत्राच्या पुरवण्याच्या माध्यमातून दिली जात असल्याने समाज आणि वर्तमानपत्र यांचे एक अतुट नातं बनले आहे.

ग्रंथालय म्हटलं कि वर्तमान पत्र असतातच

असे एक ही ग्रंथालय पाहायला मिळणार नाही कि जिथे वर्तमानपत्र येतच नाही. ग्रंथालयामध्ये येणारी वर्तमान पत्र हि फार महत्वाची असतात.कारण वर्तमानपत्रामध्ये येणाऱ्या महत्वाच्या असतील तर त्याचे कात्रण कापून ' डिस्पले बोर्ड '' वर लावले जाते, तसेच त्याची फाईल करुन ठेवल्या जातत असते आणि ती फाईल विद्यार्थ्यांना आवश्यक असल्यास उपलब्ध करुन दिली जाते कारण त्याचे वाचन ते केव्हाही करु शकतात. महाविद्यालयीन विद्यार्थी असो कि शालेय विद्यार्थी शिक्षण घेत असतांना त्यांना चौफेर नॉलेज होणं आवश्यक असते .त्याकरिता त्यांनी अभ्यासाच्या पुस्तकाबरोबरच अवांतर पुस्तकेही वाचणे फार गरजेचे आहे.त्याच बरोबर रोजचे येणारी विविध भाषातील वर्तमानपत्र उपलब्धतेनुसार वाचने सुध्दा महत्वाचे असते. विद्यार्थ्यांचे नॉलेज अपडेट ठेवण्याकरिता वर्तमानपत्राची भुमिका फार महत्वाची ठरते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत मिळते आजच्या काळात प्रत्येक जण ,प्रत्येक व्यक्ती आपल्या जिवनात आपल्या कामात व्यक्त असतो.त्यांना बाहेरच्या जगाविषयी कोणतीही कल्पना राहात नाही. यासाठी वर्तमानपत्र ही मोलाची ठरू शकते. वर्तमानपत्र जगातील अफाट माहिती मोलाची ठरू शकते. वर्तमानपत्र जगातील अफाट ज्ञान मिळवून देण्यासाठी एक उत्तम साधन आहे.

वर्तमानपत्रामधून येणाऱ्या रोजच्या जाहिरातीमुळे ज्यांना नोकरीची गरज असते असे विद्यार्थी अर्ज करु शकतात. तसेच काही जाहिराती या शासकीय नोकरी संबंधीतही असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्या विभागाच्या जागा निघाल्या आहे. त्यांनी अर्ज कधी भरायचा आहे तसेच त्याला लागणारे शिक्षण किती पाहिजे आहे.तसेच जाहिराती मध्ये ते आपल्या वेबसाईट देतात. त्या वेबसाईटवर गेले कि संपूर्ण माहिती मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये या परिक्षेबाबत जागृतता येते व ते त्यानुसार तयारी करु शकतात. तसेच स्पर्धा परिक्षेमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोगत यात छापल्या जाते. त्यामुळे यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरु शकते या करिता वर्तमानपत्राचे दररोज वाचन हे मोलाचे ठरु शकते.

...............**********.............

# ग्रंथालयाचा अहवाल

सत्र : २०२०-२०२१

ग्रंथालय म्हणजे ज्ञानप्राप्तीचे मंदिर. आधुनिक काळामध्ये ग्रंथालय हे एक नॉलेज रिसोर्स सेंन्टर म्हणून ओळखले जात आहे. आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथालय हे सुध्दा ज्ञानप्राप्तीचे एक साधनच आहे. आमच्या महाविद्यालयामध्ये चालु शैक्षणिक सत्रातील विद्यार्थी संख्या २५० होती त्यापैकी २२० विद्यार्थी ग्रंथालयाचे सभासद होते.दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा ग्रंथालयासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती देवून ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता फॉर्म भरुन घेतल्या जाते. त्यानंतर त्यानां ग्रंथालयाचे कार्ड देण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्यांना कार्डावर एक अभ्यासाचे तर दुसरे वाचनीय किंवा स्पर्धा परिक्षेचे असे दोन पुस्तके देण्यात येतात. त्याचबरोबर संदर्भ ग्रंथाची ज्यांना आवश्यकता आहे. त्यांना आम्ही ग्रंथालयामध्येच वाचनाकरिता संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देत असतो.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये इंटरनेटवर असणारी माहिती ही विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली पाहिजे या करिता आम्ही त्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करीत असतो. तसेच एन-लिस्ट च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ई-बुक आणि ई-जर्नल्सची माहिती मिळत असते.

ग्रंथालयामध्ये एकुण पाच वर्तमानपत्र विद्यार्थ्यांकरिता लावलेले आहेत.त्यांच्या ज्ञानामध्ये भर टाकण्याच्या हेतुने हे वर्तमानपत्र रोज ग्रंथालयामध्ये आम्ही विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देतो. आरामात बसून वाचन करता यावे या करिता टेबल आणि खुर्च्यांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे.

ग्रंथालयामध्ये देण्यात येणाऱ्या सेवा खालील प्रमाणे आहे.

१) देवाण -घेवाण

२) वृत्तपत्र कात्रण सेवा

३) संदर्भ साहित्य शोध

४) आवश्यकता भासल्यास आंतरग्रंथालीयन देवघेव

५) माहितीसेवा

६) इंटरनेट सेवा

७) एन -लिस्ट

8) OPAC [ Online Public Access Catalogs]

**साहित्य सपंदा :**

सत्र २०१८-२०१९ मध्ये पुस्तकांची संख्या ३२७५ होती तर सत्र २०१९-२०२० मध्ये ३५४१ इतकी ग्रंथसंख्या झाली आहे. एकुण २६६ ग्रंथाची ग्रंथसंख्येमध्ये भर पडलेली आहे.

**विशेष उपक्रम :**

या सत्रामध्ये ग्रंथालय विभागातर्फे घेण्यात आलेले कार्यक्रम

१) डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती

२) वाचन प्रेरणा दिना निमित्त पुजनाचा कार्यक्रम

३) डिश डेकोरेशन ,फॅन्सी ड्रेस कॉम्पिटीशन ,रांगोळी स्पर्धा घेतल्या जातील.

# मराठी भाषा नष्ट होईल ही भीती अनाठायी

प्रा.डॉ.अशोक व्ही.वाहुरवाघ
(सहा. प्राध्यापक मराठी विभाग)

आज अनेक विचारवंत मराठीच्या भविष्यकालीन परिस्थितीबद्दल बोलताना व्याकूळ झालेले दिसतात. पण तसे होण्याची गरज नाही. ब्रिटीशांच्या आणि मुस्लिमांच्या राजवटीतही मराठी टिकून राहिली. मग, आता ती का राहणार नाही ? ही भाषा समृध्द होण्यासाठी आपणच आपल्या पातळीवर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.भाषा ही नष्ट होत नसते तर काही बदल पचवून वेगळ्या अंगाने बहरत असते.पाण्याला जसा मार्ग सापडत नाही तोपर्यंत पाण्याचा वेग मंदावतो. पण, म्हणून पाणी नष्ट झाले आहे. संपले आहे, अशी ओरड करता येत नाही. सध्या जागतिकीकरणात मराठीचा वेग मंदावला आहे, तो फक्त वाढवावा लागेल.

ब्रिटीशांच्या राजवटीत मराठीकडे बरेच दुर्लक्ष झाले. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी ती राजभाषा करण्यात आली. हा सर्वांगीण विकास म्हणजे काय हे जाणून घेताना काही गोष्टींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांचे माध्यम मराठी असले पाहिजे.राज्य सरकारच्या सर्व संस्थांमधून मराठीतच व्यवहार झाले पाहिजेत. मंत्रालय, न्यायपालिका अशा सर्वच स्तरावर मराठीतूनच व्यवहार झाले पाहिजेत. आज हे व्यवहार मराठी माध्यमातून काही प्रमाणात होत आहेत. पण त्याला जेवढी गती मिळायला हवी तेवढी ती मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर ,मराठीचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित केला जातो. मराठी भाषा ही इतकी समृध्द आहे की, ती कधीही नष्ट होणार नाही. आपल्या देशावर ४०० वर्षे मुस्लिमांचे राज्य होते आणि ब्रिटिशांची सत्ता १५० वर्षे होती. या काळात मराठीमध्ये बदल झाले, पण ती नष्ट झाली नाही.त्यामुळे मराठी भाषा नष्ट होईल. अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

मराठी ही राजभाषा झाल्यानंतर तिला राजाश्रय मिळाला सरकारच्या दरबारात ती प्रभावी ठरली. राजदरबारात प्रत्येक शब्द मराठीतच बोलला पाहिजे, असा नियम करण्यात आला. मराठी भाषेचा इतका प्रभावी वापर झाल्यामुळे सगळेच जण मराठी बोलू लागतील, अशी अपेक्षा होती; पण तसे होत नाही. तरीही केवळ मराठी शब्द वापरणे म्हणजे मराठीचा सन्मान करणे नाही. आपल्या जाणीवा आणि अस्मिताही मराठीतूनच व्यक्त व्हायला पाहिजेत. स्वाभिमानापेक्षा स्व–अस्मितेला महत्व आहे, हे लक्षात घेऊनच मराठीचा वापर झाला पाहिजे.

आज भाषेचा वापर अतिशय यंत्रवतपणे होत आहे. सद्सद्विवेकबृध्दी आणि जाणीव असल्याशिवाय मराठी संपन्न होणार नाही. भाषा ही कधीही भांडणाचे कारण होऊ शकत नाही. भाषा समृध्द होण्यासाठी अनेक प्रयत्न होणे आवश्यक आहे. केवळ राजभाषेचा दर्जा दिला म्हणूनच भाषा समृध्द होईल. असे म्हणता येणार नाही. भाषा ही अतिशय लवचिक आणि उदार असते .आज मराठी भाषा समृध्द होण्यासाठी समाजाच्या सर्व क्षेत्रात तिचा वापर झाला पाहिजे. सर्मथपणाने तिचा गौरव आपण केला पाहिजे. मराठीत अनेक बलस्थाने आहेत. आधुनिक काळात वर्तमानाचा विचार करता भाषा समृध्द होण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. काळ,वेग आणि भान या त्रिसुत्रीची आवश्यकता आहे.

केवळ सरकारी पातळीवर मराठीची जपणुक

होईल. असे आपण मानता कामा नये. आपण आपल्या पातळीवरिल मराठीचा वापर सर्व क्षेत्रात केला पाहिजे. याचा अर्थ माणसांनी स्वत:च्या भाषेशिवाय दुसरी भाषा बोलूच नये. असा नाही. माणसाने बहुभाषिक असले पाहिजे; पण त्याचबरोबर आपल्या भाषेला समृध्दी येण्यासाठी तिचाही वापर सर्व क्षेत्रात झाला पाहिजे. असे झाले तरच मराठी भाषेला भविष्यात सध्यापेक्षा अधिक समृध्दी येऊ शकेल. आज इंग्रजी ही जागतिक व्यवहाराची भाषा मानली जाते. ही भाषा आपल्याला यायला हवी, यात शंका नाही, पण त्याचबरोबर मातृभाषेचा आणि तिच्या संस्कारांचाही आपल्याला अभिमान असला पाहिजे.

भाषेच्या समृध्दीतूनच समाजाचा विकास होऊ शकतो. जागतिक व्यवहार आणि भाषेची समृध्दी याचा विचार करता मातृभाषा ही दोघांचा पूल आहे. असे म्हणावे लागेल. भाषेमुळे जगण्याला अर्थपूर्णत: येत असते हे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे.

कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला कसा दर्जा मिळाला पाहिजे. हे आपल्या लेखातून काव्यातून मांडले आहे.राजकीय दरबारात मराठी भाषा कटोरा घेऊन उभी आहे, असे ते म्हणतात मराठीची अशी दैना आपणच करुन टाकली आहे. आज आपल्याकडे मराठी भाषेत कितीतरी समृध्द असे ग्रंथ भांडार आहे.त्यामध्ये सुभाषिते, ओव्या,अभंग असे कितीतरी ग्रंथ भांडार आपल्याकडे उपलब्ध आहे.त्याचा विचार आपण केला पाहिजे. मराठीचे ऋण आपल्यावर इतके आहे की, ते शब्दात व्यक्त करण्यात येण्यासारखे नाही, ज्ञानेश्वरांनी ओव्या लिहिल्या तर तुकारामांनी अभंग लिहिले, हे मराठी भाषेवरचचे ऋणच आहे.आजवर मराठी मध्ये अलौकिक अशी कामगिरी झाली आहे. मराठीपण हे काळाच्या ओघात आपण विसरता कामा नये. मराठी समृध्द झाली, तर अनेक प्रश्न सुटु शकतील. अगदी सीमा प्रश्नांसारखे महत्वाचे विषयही यामुळे सुटु शकतात. पण याचा विचार करायला आपल्याला वेळ नाही. विचारांचे आदान–प्रदान करताना मराठीचा वापर झाला पाहिजे. आज इतर भाषांच्या तुलनेत आपण मराठीला मागे टाकले आहे, असे होता कामा नये. आत्मविश्वासाने आपण मराठीचा वापर करायला शिकले पाहिजे. आज शिक्षण मंडळात विशेषत: बोर्डाच्या परिक्षेत मराठीला तिसरे स्थान असते. असे करण्याची खरे तर काही आवश्यकता नाही. मराठी ही आपली मातृभाषा असताना तिला पहिल्या स्थानावर ठेवले पाहिजे. आज मराठीबरोबरच इंग्रजीचाही वापर होत आहे ; पण त्यामुळे अनेक वेळा आपल्याला धड इंग्रजीही बोलता येत नाही आणि धड मराठीही बोलता येत नाही, अशी परिस्थिती आहे.मराठी ही कितीतरी श्रीमंत भाषा आहे.

बंगाली माणसाला त्याची मातृभाषा महत्वाची वाटते, तर ती आपल्याला का वाटू नये, या गोष्टीचा विचार व्हायला पाहिजे.कमीत कमी एक हजार वर्षापासून मराठी भाषा अस्तित्वात आहे.मराठी भाषेचा उदय संस्कृतच्या प्रभावाने प्राकृत भाषेच्या महाराष्ट्रीचा या बोली भाषेतून झाला. पैठण येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा वापर सर्व प्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा आणि संस्कृत भरभराटीला आली. मराठी भाषेला इतका मोठा इतिहास असताना आपण तो का विसरत आहोत. प्रसिध्द कवी सुरेश भट यांनी मराठी भाषेची दैना कशी झाली आहे. याचे वर्णन आपल्या एका कवितेत केले आहे. पाहुणं घरी असंख्य पोसते मराठी आपल्या घरात हाल सोसते मराठी असे किती का खेळ पाहते.मराठी शेवटी मदांध तखत फोडते मराठी' अशा शब्दांत त्यांनी मराठीची दैना व्यक्त केली. आज मराठी भाषेचे ऋण न विसरता तिचा वापर करायला आपण शिकलं पाहिजे मराठी भाषा नष्ट होईल ही भिती अनाठायी आहे.

# कोरोना – आर्थिक सामाजिक परिणाम

डॉ.पंकज एम. तायडे
(अर्थशास्त्र विभागप्रमुख)

प्रस्तावना :

' कोरोना ' शब्द ऐकला की अंगावर शहारे उभे राहतात. आज केवळ भारतच नव्हे तर जगातील अनेक देशांना या भयंकर विषाणूने जणू गिळंकृत करण्याचा चंग बांधला की काय अशी स्थिती आहे. सध्या जगातील वैद्यकीय आणि सामाजिक संस्था सरकार सोबत जिकरीने दिवसरात्र विषाणू वर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न करित आहेत. तसेच या विषाणूवर मात करण्यासाठी लसीकरणाला सुध्दा सुरुवात झाली आहे. तरी पण तोंडाला मुखपट्टी आणि सामाजिक अंतर हे दोन महत्वाचे पथ्य सामाजिक जीवन जगतांना पाळणे आवश्यक आहे. परिस्थितीचा आढावा घेतल्यास या परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे हे केवळ राज्यकर्त्यांचे काम नाही. तर त्यांच्या धोरणांना सहाय करणे ( जसे – सामाजिक सोहळ आणि मुखपट्टी Social Distancing & Mask ) ही सामाजिक गरज सुध्दा आहे. त्यासाठी भारतीय ताकदीने एकवटलेले दिसतात.

कोरोना विषाणू देशात थैमान घालत असतांना तो नियंत्रित करण्यासाठी शासनाला लॉक डाऊन सारखे कठोर निर्णय घ्यावे लागले. लोकांना सामाजिक अंतर पडण्यास भाग पाडण्यासाठी भारत सरकार सोबतच सर्व राज्यांनी कडक लॉक डाऊन कायद्याने पाळणे बंधनकारक केले. त्यामुळे लोकांचा लोकांना संसर्ग होण्याचे प्रमाण कमी झाले. कालांतराने सरकारने लॉक डाऊन मागे घेऊन जनजीवन आणि अर्थव्यवस्था पूर्व पदावर आणण्याचे प्रयत्न सुरु केले. मात्र सामाजिक आणि धार्मिक उत्सव व राजकीय कार्यक्रमांवर काही निर्बंध घातल्या गेले. त्यापैकी एक म्हणजे विवाह सोहळ्यास केवळ ५० लोकांची उपस्थिती असावी. या निर्बंधाचा विवाह संस्थेवर आणि कुटुंबाच्या उत्पन्नावर परिणाम झाला. त्याचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात आला.

कोरोना स्थितीच आढावा :

कोरोना हा विषाणू आहे जो संसर्गजन्य आजार म्हणून ओळखला जातो. याचा प्रादुर्भाव सुरुवातीला चीन मध्ये झाला. पुढे संसर्गातून तो जगभर पसरला या याबाबत आपण सर्वजण सर्वश्रृत आहात. कोरोना विषाणू पासून होणारा आजार संसर्गातून फैलतो. या विषाणूने जगभर हाहाकार उडवून दिला. जागतिक आरोग्य संघटनेने तर या विषाणूचा आघात खूपच जास्त होत असल्यामुळे ११ मार्च २०20 ला या रोगाला महामारी म्हणून घोषित केले. तेव्हा संपूर्ण जगातील विविध देशांनी या महामारी पासून स्वत:चे करण्यासाठी उपाय योजना अवलंबायला सुरुवात केली. कोरोना महामारीने लाखो लोकांचे जीव घेतले. हजारो कुटुंब कोलमडुन पडली, याशिवाय आर्थिक ,सामाजिक जीवनावर विपरित परिणाम झाले. दि. २३ मार्च; २०२१ रोजी प्रकाशित दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्रात प्रकाशित आकडेवारी नुसार सध्या देशात एकुण ११६.४६ लाख रुग्ण आहेत.त्यापैकी १११.५१ लाख रुग्ण पूर्णत: बरे झाले तर १.५९ लाख मृत्यू पावले. त्याच प्रमाणे महाराष्ट्रात एकुण २५.३४ लाख रुग्ण आहेत. पैकी २२.३४ लाख पूर्णत: बरे झाले तर ५४.४५७ लोक मृत्यू पावले. ही आकडेवारी

सामान्य माणासाची झोप उडवणारी आहे. कोरोना रुग्ण वाढीची ही अवस्था मार्च २०२० पासून झपाट्याने पुढे यायला लागली. हि रुग्ण वाढ रोखण्यासाठी कोरोना रुग्णांचा संचार थांबवणे आवश्यक होते. म्हणून २२ मार्च २०२० रोजी लोकांच्या मुक्त संचारावर ' लॉकडाऊन ' च्या माध्यमातून बंधने लादण्याचा प्रयत्न सरकारने केला. लॉकडाऊन च्या नियमावली नुसार विविध कार्यक्रमांवर बंदी घातली गेली. प्रस्तुत लेखात आपण कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी लावलेल्या कडक लॉकडाऊन मुळे विविध सामाजिक समारंभ पैकी विवाह समारंभावर झालेल्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करीत आहोत.

कुटुंब व्यवस्था आणि विवाह पध्दती :

भारतामध्ये काही ठीकाणी संयुक्त तर काही ठिकाणी विभक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात असलेली आढळते. कुटुंब प्रमुख हा कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास जबाबदार समजल्या जातो. कौटुंबिक चरितार्थ चालवणे, मुला -मुलींना योग्य शिक्षण देणे, त्यांच्या नोकरी किंवा व्यवसायाची व्यवस्था करणे आणि विवाह करुन देणे हया प्रमुख जबाबदाऱ्या कुटुंब प्रमुखाच्या असतात. या जबाबदाऱ्या पार पडतांना अपत्यांच यशस्वी भविष्य घडवणे हा त्याचा उद्देश असतो. हे सगळ करतांना पित्याची आर्थिक घडी विस्कळीत होवू शकते. प्रसंगी मुला-मुलींवर पित्याचे असणारे प्रेम त्याला कर्ज घेवून हया सगळ्या बाबी करण्यास भाग पाडते.भारतीय कुटुंब व्यवस्थेत विवाह हा महत्वपूर्ण संस्कार मानल्या जातो. तो चांगल्यात चांगल्या प्रकारे साजरा व्हावा ही वधू तथा वर पित्याची मानसिकता असते. भारतीय संस्कृती मध्ये आपल्या अपत्यांचे विशिष्ट वयात विवाह पार पाडणे ही कुटुंब प्रमुखाची जबाबदारी मानल्या जाते. मुलगा /मुलगी वयात आल्यानंतर त्यांचा विवाह उरकून टाकण्याची घाई वडील मंडळींना होते. विवाह विविध स्वरुपात केल्या जातो. विवाह सोहळ्यात भिन्न भिन्न विधी पार पाडल्या जातात जसे वधू मंडपी मेहंदी ,हळद मंगलाष्टके विवाह सोहळा, सप्तपदी ,जेवनावळी आणि बिदाई इत्यादी. त्याचप्रमाणे वर मंडपी सुध्दा काही विधी पार पाडल्या जातात. पार पडणाऱ्या विधींच्या स्वरुपावरुन विवाह सोहळ्याचा खर्च निश्चित होत असतो.

सध्यस्थिती आधुनिकतेचा मोठा पगडा भारतीयांच्या मानसिकतेवर निर्माण झाला आहे. गर्भ,श्रीमंत,श्रीमंती, मध्यम वर्गीय आणि सामान्य असे वेगवेगळे कुटुंब आर्थिक दृष्टया आढळतात.गर्भ श्रीमंत आणि श्रीमंत लोकं विवाह अतिशय थाटात पार पाडतात. भारतीय जीवन पध्दतीवर प्रदर्शनाच्या मोठा प्रभाव आहे. इतरांच्या प्रमाणे आपणही जगल तथा वागलं पाहिजे ही भावना मनात निर्माण होते. उच्च उत्पन्न गटातील व्यक्तीने काही जास्तीचे खर्च करुन विवाह सोहळा साजरा केला तर हरकत नाही कारण त्याने आर्थिक तरतुद केलेली असते. मात्र त्यांचे पाहुन मध्यमवर्गीय किंवा सामान्य व्यक्तीने वागणे त्याच्या आर्थिक विवंचनेत भर टाकते.

विवाह सोहळ्याचे आर्थिक परिणाम :

आपल्या लोडक्या मुला-मुलीचा विवाह संस्कार आपणही थाटात करु ही भावना सामान्यांना कर्जाच्या खाईत लोटते. कर्ज काढून विवाह लावून देवू नका असं समाजाला समजावून सांगण्यातत गाडगे बाबा सरले पण भारतीयांच्या मनावर त्याचा परिणाम झाला नाही. आज तर थाटात विवाह सोहळे पार पडण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. मोठ्यांच्या कार्याचा मध्यमवर्गीय विशेष

करुन शेतकरी कुटुंबावर झालेला प्रभाव घातक ठरतो. शेतकरी तसेच मध्यमवर्गीयांनी विवाह हा एक दिमाखदार सोहळा करुन नये असे मला म्हणायचे नाही.पण आपल्या आर्थिक स्थितीला धक्का लागणार नाही याची काळजी घ्यायला पाहिजे. बऱ्याच प्रसंगी शेतकरी पिकासाठी घेतलेला पीककर्ज विवाह सोहळ्यावर खर्च करतात आणि शेती मात्र परंपरागत पध्दतीने करतात. इथेच गणित चुकते.

एक विवाह सोहळा कितीही साध्या पध्दतीने करतो म्हटले तरी मुलभुत विवाह विधी पार पडण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. विविध विधी साध्या पध्दतीने पार पडल्यास किमान पाचशे लोकांच्या उपस्थितीत विवाह सोहळा साजरा केल्यास दोन लाख रु. खर्च येतो. मध्यम स्वरुपाचा सोहळा असल्यास तीन लाख तर उच्च दर्जाचा सोहळा साजरा केल्यास पाच लाख खर्च येतो. उच्चभू लोकांच्या विवाहाच्या खर्चाचा आपण अंदाजच घेवू शकत नाही. ऐकलेल्या माहिती नुसार उच्चभू लोकांचे विवाह सोहळे किमान दहा लाख तर कमाल कितीही खर्च करु शकतात. या ठिकाणी उद्देश केवळ मुला-मुलीचा विवाह लावून देणे हाच असतो. परंतु वधू तथा वर पित्याला समाजामध्ये आपला प्रभाव निर्माण करायचा असतो त्यासाठी वाट्टेल तो खर्च करायाला ते तयार असतात. अर्थात याला सामान्य पालक अपवाद ठरतात. पण कोरोना स्थितीतील बंधनांमुळे या सामान्य आर्थिक स्थिती असणाऱ्या पालकांची विशेष बचत झाली. ही बाब वधू /वर पित्यांशी चर्चा करतांना लक्षात आले.

कोरोना स्थितीचा विवाह समारंभावर झालेला परिणाम : टाळेबंदी (Lockdown) च्या निर्णयामुळे संपूर्ण आर्थिक व्यवहार,धार्मिक सामाजिक राजकीय उत्सव बंद झाले, ही स्थिती साधारणत: मे महिन्यापर्यंत देशात लागू होती, पुढेही नोंव्हेंबर २०२० पर्यंत विवाह समारंभावर बंदीच होती. नेमके विवाह सोहळे पार पडण्यासाठी हाच कालावधी योग्य मानल्या जातो, पण लॉकडाऊन मुळे विवाह सोहळे स्थगित झाले.तरी सुध्दा काही काळजीवंत पित्यांनी ( विशेषत: ग्रामीण भागातील) आपल्या मुला - मुलींचे विवाह चोरुन उरकून टाकले. याचा त्यांच्या आर्थिक बचतीस मोठा फायदा झाला.

कोरोना च्या स्थितीचा आर्थिक सामाजिक परिणाम याचा शोध घेतांना काही वधू-वर पित्यांची चर्चा केली असता या स्थितीचा आर्थिक फायदा झाल्याचे मत व्यक्त केले. विवाह समारंभ जेवणावळी, वधू ला दिल्या जाणाऱ्या भेटवस्तु जसे सुवर्ण अलंकार ,कपडे इतर गृह उपयोगी वस्तु याशिवाय अनेक बाबींवर खर्च करावा लागतो. यातील काही खर्च संपत्तीचे निर्माण करतात तर काही खर्च अनुत्पादक (वायफळ)असतात. या काळात वऱ्हाडी संख्या ५० पर्यंत च मर्यादित होती त्यामुळे प्रत्येक विवाह सोहळ्यात प्रामुख्याने किमान एक लाख रुपये जेवणावळी वरचे वाचले.मंडप सजावट / सभागृह याच्या खर्चापोटी होणारे एक लाख, याशिवाय उपस्थितीत लोकांना द्यायच्या भेट वस्तु वर होणार किमान पन्नास हजार खर्च वाचला. इतर किरकोळ खर्चांवर होणारे पन्नास हजार वाचले असे वधू पित्याचे किमान तीन लाख रु. वाचले तर अश्याच प्रकारे वर पित्याचे वाजंत्री,वाहन भव्य स्वागत समारंभ या सारख्या कार्यक्रमावरचा किमान दोन लाख रु. वाचला.

कोरोना-आर्थिक सामाजिक परिणाम

: कोरोना महामारीच्या काळात अनेक कुटुंबाची आर्थिक व जीवित्व हानी झाली. याच परिस्थितीने लोकांनी

समाजामध्ये कसे वागले पाहिजे याचे नियम सुध्दा घालून दिले. या सर्व परिस्थितीतचा समाज व्यवस्थेवर
कसे परिणाम झाले याचा अभ्यास आपण विवाहाच्या संदर्भात केला आहे. या संशोधनांत प्राप्त निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) साधे विवाह समारंभ ही काळाजी गरज आहे कारण यामुळे आर्थिक बचत होते याचे लोकांना ज्ञान झाले.

२) समाजाने विवाह समारंभाने रुपांतर विवाह संस्कारा मध्ये केले पाहिजे कि ज्यामुळे विवाह सोहळा पार पडेल पण खर्च होणार नाही.

३) वधू-वर पित्यांना विनाकारण लाखो रुपये खर्चून विवाह करुन देतात ज्यामुळे अथक कष्ट करुन मिळवलेली संपत्ती नाश पावते यातून बाहेर पडण्याची संधी कोरोना मुळे प्राप्त झाली.

४) साध्या पध्दतीने विवाह लावल्यामुळे जो खर्च वाचला त्यामुळे कुटुंब प्रमुखाच्या वास्तविक उत्पन्नात वाढ झाली.

५) प्रभावशाली विवाह सोहळे पार पाडण्याच्या शर्यतीत भांडवलदारी ला खतपाणीच घातल्या जात होते. त्याला आळा बसला

६) साध्या पध्दतीने विवाह केल्या मुळे या कार्यक्रमात दैनिक मजुरी करणाऱ्या सफाई कामगार, स्वयंपाकी,वाजंत्री वाले व इतर किरकोळ लोकांचे नुकसान झाले, पण त्यांनी इतर ठिकाणी काम करुन उत्पन्न मिळवले.

७) दिमाखदार विवाह सोहळ्यावर होणारे खर्च जसे भव्य मंगल कार्यालयाचे भाडे, मिष्ठांन जेवणाचा खर्च, संगीत,रोषणाई व इतर सुख सोई वर होणारा खर्च भांडवलदाराचा खिशात जातो. त्यामुळे श्रीमंत आधिक श्रीमंत होतात. हा खर्च वाचल्यामुळे गरीब व श्रीमंता मधली दरी कमी होण्यास मदत झाली.

८) जेवणावळी, मानपान इत्यादी वर खर्च करण्याची संधी कोरोना ने हिरावून घेतल्यामुळे झालेल्या बचतीतून वधू वरांच्या भावी प्रगतीला हातभार लावण्यासाठी भांडवल निर्माण झाले.

९) विवाह सोहळ्यास उपस्थिती लावणाऱ्या आप्त स्वकीयांचे खर्च वाचण्यास मदत झाली.

सारांश : - औद्योगिक प्रगती होत असतांना शेतीचे उत्पन्न कमी होत आहे. शेती मालाला भाव नाही. सरकारी नोकऱ्या दुरापास्त झाल्या अश्या स्थितीत अनाठायी खर्च वर-वधू पित्यांना करावा लागत होता. निसर्गाला सर्वसामान्यांची होणारी आर्थिक कुचंबना मान्य नव्हती म्हणून कोरोनाच्या माध्यमातून खर्च कमी करुन भांडवल निर्मितीत भर टाकण्याची जणू संधीच दिली. विवाह सोहळ्यावरिल खर्चाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाल्या मुळे सर्वसामान्यांच्या अनावश्यक खर्चात घट झाली. तसेच मोठे सभागृह, मालक, जेवण पुरवणारे कंत्राटदार, भव्य कापड दुकानदार यांच्या उत्पन्नात घट झाली त्यामुळे गरिबी व श्रीमंतीतील दरी कमी होण्यास मोलाची मदत झाली.

..............*******..................

# निर्वासित कामगार व शेतमजुरासंबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका

डॉ.वासुदेव वा.भगत
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

प्रस्तावना :

**डॉ.**बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे अनेक महत्वपूर्ण पैलू आहेत. त्यांच्या सर्वच क्षेत्रातील अतिशय महत्वपुर्ण योगदानाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचलेली नाही. तसेच एक योगदान म्हणजे त्यांनी भारताच्या फाळणी दरम्यान पाकिस्तानमध्ये अडकलेल्या अस्पृश्य कामगार,शेतमजूर यांना भारतात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नाचा समावेश होतो. त्यांच्या प्रयत्नातुन भारतात स्थलांतारित झालेल्या निर्वासित अस्पृश्य कामगार,शेतमजूर यांच्या न्याय्य हक्कासाठी सुध्दा त्यांनीच प्रयत्नाची पराकष्ट केली होती. त्यासंबंधीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्कालीन भूमिकेचे अध्ययन उपरोक्त संशोधन लेखात करण्यात आले आहे. १९४७ च्या ब्रिटीश पार्लमेंटच्या कायद्यानुसार भारताचे विभाजन करुन स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मित्तीला मान्यता देण्यात आली होती. भारताच्या प्रदेशातून पाकिस्तानात जाणारे निर्वासित आणि पाकिस्तानातून भारतात दाखल होणारे निर्वासितांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामधूनच हिंदू आणि मुस्लिम यांच्यात संघर्ष होऊन मोठ्या प्रमाणात जिवित आणि वित्तहानी झाल्याचे सुध्दा नमुद आहे. त्या संघर्षाच्या सविस्तर वर्णनाचा किंवा विश्लेषणाचा सदर संशोधन लेखाच्या विषयाशी संबंध नाही. परंतु त्याच कालावधीत पाकिस्तान मध्ये अस्पृश्य कामगार,शेतमजुर यांच्या समस्या आणि भारतातील अस्पृश्य निर्वासितांच्या समस्या,पूर्व पंजाबातील शेतमजुरांच्या समस्यांवर डॉ.आंबेडकरांनी योजलेली समयोचित उपयोजना याचेच अध्ययन सदर संशोधन लेखामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. डॉ.आंबेडकरांना पाकिस्तानातील प्रतिबंदीत (अडकलेल्या) अस्पृश्य कामगार आणि शेतमजुरांनी पत्र पाठवून तसेच अन्य व्यक्ती मोर्फत तक्रारी पाठविल्या होत्या.त्या आधारे डॉ.आंबेडकरांनी १८ डिसेंबर १८४७ ला तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांना वरील समस्यांची गंभीरता दर्शविणारे पत्र लिहले होते.त्या माध्यमातून भारत सरकारच्या वतीने पाकिस्तानातील अस्पृश्य कामगार व शेतमजुरांच्या मुक्तीसाठी विशेष प्रतिनिधी पाठविण्याचे सुचित केले होते. शिवाय पाकिस्तानमधून भारतात दाखल झालेल्या अस्पृश्य कामगार व शेतमजूरांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्याचेही सूचित केले होते.डॉ.आंबेडकरांच्या या संबंधीच्या एकुण भूमिकेचे अध्ययन पुढील तीन भागात करण्यात आले आहे.

१) पाकिस्तानातील बंदीस्त अस्पृश्य कामागारांना मदत :

भारताच्या फाळणीचा निर्णय जाहिर झाल्यानंतर भारतातून मुस्लिमांचे आणि पाकिस्तानातून हिंदु जनतेचे स्थलांतर झाले. त्याच दरम्यान पाकिस्तानातील अस्पृश्यांना हिंदुस्तानात यायला तेथील शासनाद्वारे बंदी घातली होती. कारण ते सर्व भंगी जातीतील होते. तेथील साफसफाईचे काम करण्यासाठी भंगी लोकांची नित्यांत आवश्यकता वाटत होती. अशा प्रकारची त्यांच्या अमानवी इच्छेला अनुसरुन भंगी जनतेवर होणाऱ्या दडपशाही विरुध्द लढणारा कोणीही पाकिस्तानात

नव्हता. शेवटी निर्वाणीचा उपाय म्हणुन डॉ.आंबेडकरांकडे त्यांनी मदतीची याचना केली होती. अ) पाकिस्तान सरकारने अस्पृश्य निर्वासितांच्या स्थलांतराच्या कार्यात अडथळे आणू नयेत असे सदर सरकारास सांगणे ब) एम.ई.ओ. या संस्थेला अस्पृश्यांच्या स्थलांतराचे कार्य करु देणे. असे सदर सरकारास सांगणे आणि क) अस्पृश्यांच्या स्थलांतराचे कार्य पूर्ण झाल्यानंतरच ही संस्था भारत सरकारने बंद करावी '' या शिवाय एकुण नऊ प्रकारच्या अतिशय तातडीच्या उपाय योजना पाकिस्तानातील बंदिस्त करण्यात आलेल्या भंगी जनेतची दखल घेवुन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी भारत सरकारचा विशेष प्रतिनिधी म्हणुन दादासाहेब गायकवाड यांना ६ डिसेंबर १९४७ ला पाकिस्तानला पाठविले. दादासाहेब गायकवाड यांनी तेथील निर्वासित केम्पला भेटी दिल्या. तेथील कॅम्पमध्ये १६ हजार निर्वासित होते. त्यात अस्पृश्य निर्वासितांची कहाणी अत्यंत करुन आणि शोकजनक होती. या संबंधीचा सविस्तर वृत्तात गायकवाड यांनी डॉ.आंबेडकरांना कळविला.शेडयुलकास्ट च्या लोकांना पाकिस्तान सरकार भारतात येऊ द्यायाला तयार नाही. हे लोक पाकिस्तानला हलकी कामे करण्यासाठी ,शेतावर मजुर म्हणून राबविण्यासाठी हवे होते. त्यातल्या त्यात झाडुवाल्याची तर त्यांना अत्यंत गरज होती म्हणून झाडुवाल्यांनी नोकरी पाकिस्तानान अत्यावश्यक नोकरी म्हणून जाहिर केली होती. त्यांना तर ते सोडायला तयार नव्हते. भारत सरकारने पाकिस्तान सरकारला सांगून लवकरात लवकर अस्पृश्यांची मुक्तता करावी '' ह्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवुन डॉ.आंबेडकरांनी १८ डिसेंबर १९४७ ला तत्कालीन प्रधानमंत्री पंडित नेहरु यांना सविस्तर पत्र लिहले. त्यामधील ठराविक मजकुरात डॉ.आंबेडकर लिहितात. ना करण्याची विनंती डॉ. आंबेडकरांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांना केली होती. त्या मध्ये पाकिस्तानातील अस्पृश्यांच्या स्थलांतर समस्ये बरोबरच भारतात स्थलांतरित झालेल्या अस्पृश्य निर्वासित कामगारांच्या होणाऱ्या छळवणुकीची माहिती सुध्दा दिलेली होती. स्थलांतराच्या कालावधीत पाकिस्तान आणि भारत सरकारच्या प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असतांना केवळ अस्पृश्य कामगारांवर वरील प्रमाणे होणारा मतभेद विषमता आणि जतिभेदाच्या प्रवृत्तीचे धोतक होते. त्यांना अन्य जातीचे अधिकारी मदत करणार नाहीत म्हणून डॉ. आंबेडकरांनी पाकिस्तानच्या सिंध,भावलपुर सरहद् प्रांत येथे अस्पृश्य अधिकारी म्हणून पाठविण्याचे सुध्दा भारत सरकारला सुचित केले होते. पाकिस्तानातील अस्पृश्य कामगारांची निर्वासित शिबिरातील स्थिती सुध्दा अतिशय दयनीय स्वरुपाची होती.

२) भारतातील अस्पृश्य निर्वासित कामगारांच्या समस्या :-

पाकिस्तानातील अतिशय बिकट परिस्थितीला तोंड देवून अस्पृश्य कामगार भारताच्या निर्वासित छावणीत पोहोचले होते. येथील व्यवस्थेचे प्रमुख अधिकारी उच्च वर्णीय हिंदू असल्यामुळे भारतात आल्यानंतरही अस्पृश्य कामगारांना अन्य निर्वासितांप्रमाणे सुविधा मिळत नव्हत्या. त्यावर सुध्दा डॉ. आंबेडकरांनी प्रधानमंत्र्यांना पाठविलेल्या पत्राद्वारे उपाय योजना करण्याची विनंती केली होती. भारत सरकारने अस्पृश्यातील काही अधिकारी पूर्व पंजाबात नेमले तर अन्य व्यवस्थेबरोबरच अस्पृश्याना योग्य त्या प्रमाणात जमिनी मिळतात की नाही हे डोळ्यात तेल

घालून पाहू शकतील.पूर्व पंजाबातील शिख व जाटांच्या छळापासून अस्पृश्याची मुक्ती करण्यासाठी पंजाबच्या पोलिस खात्यात अस्पृश्यांची नियुक्ती करण्यासबंधी सुध्दा डॉ. आंबेडकरांनी सुचित केलेले होते. ' पाकिस्तान मधून आलेले बहुसंख्य अस्पृश्य पूर्व पंजाबमध्ये दाखल झाले होते. सामाजिक स्थितीची वास्तवता डॉ.आंबेडकरांना पंजाब संबंधी जात होती. त्यापेक्षाही अधिक गंभीर स्वरुपाचा जातीयतेच्या आधारे अस्पृश्य कामगारांचा निर्वासित शिबिरामध्ये सुध्दा उच्चवर्णीय जनता आणि अधिकाऱ्याकडुन छळ करण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी डॉ.आंबेडकरांकडे करण्यात आल्या होत्या. त्यावर निर्वाणीचा उपाय म्हणून विशेष अस्पृश्य अधिकारी आणि पोलीस खात्यात अस्पृश्यांची भरती करण्याला प्राधान्य देण्याचे डॉ.आंबेडकरांनी भारत सरकारला सुचित केले होते.

३) पूर्व पंजाब मधील अस्पृश्य शेतमजुरांच्या समस्या :- पाकिस्तान मधून स्थलांतर झालेले लाखो हिंदू निर्वासित पूर्व पंजाबमध्ये आलेले होते. तसेच पूर्व पंजाबमधून लाखोच्या संख्येतील मुस्लिम त्यांच्या जमिनी अन्य संपत्ती सोडून पाकिस्तानात निघून गेलेले होते. अशा प्रसंगी पाकिस्तानातून आलेल्या अन्य हिंदू जनतेप्रमाणे अस्पृश्य कामगारांना शेतजमिनी मिळाव्या असे प्रयत्न डॉ.आंबेडकरांनी केले होते. या संबंधीच्या घडामोडी डॉ.आंबेडकरांचे निकटवर्तीय सोहनलाल शास्त्री यांच्या समक्ष झालेल्या होत्या. त्या संबंधीची माहिती त्यांनी बाबासाहेब डॉ. आंबेडकर के संपर्क में पच्चीस वर्ष या ग्रंथात सविस्तर दिलेली आहे. या प्रसंगी पूर्व पंजाब मध्ये एकुण चाळीस लाख एकर जमिन निर्वासितांना देण्यासाठी उपलब्ध होती. त्या पैकी अस्पृश्य कामगारांना जमीन मिळवून देण्यासाठी डॉ.आंबेडकरांना पंजाबमधील तत्कालीन नेत्यांनी प्रखर विरोध केला होता. त्यासंबंधीच्या घटना क्रमाचा एक नमुना सोहनलाल शास्त्री यांच्या लिखाणातून बाबासाहेब ने पंडित जवाहरलाल से चार लाख एकड भूमी इधर अछुतों को अलाट करने के लिए कह भी दिया। जवाहरलाल जी ने उनकी इस मांग को उचीत और न्याय-संगत माना और बाबासाहेब से ऐसा ही कर देने के लिए वायदा भी कर दिया। इस बारे में पंजाब सरकार से राय देणे के लिए सरदार प्रताप सिंह कैरो,जो तब वहा कि सरकार में मंत्री थे ,दिल्ली आए और उन्होंने बाबासाहेब कि इस मांग का कडा विरोध किया। आखिरकार कैरो ने जवाहरलाल को धमकी के रुप मे कहा कि यदि आपने चुड्डे -चमारों को मुसलमानो से छोडी संपत्ती और जमीन में हिस्सेदार बना दिया तो जाट जमीनदार अपना गुजारा चोरी और डाके डालकर ही करेंगे ।...अन्त में घटाते -घटाते चार लाख एकड भूमी अच्छुत शरणाथियो को देणे की बाजाए एक लाख एकड भूमी देने का वायदा किया गया। सिख हिदू प्रमाणे (सिखलकरी हिंदू) अस्पृश्य जातीतील लोक सुध्दा भारतातील नागरिक होते. तसेच ते भूमिहीन शेतमजुर आणि कामगार होते. अन्य भारतीय नागरिकांप्रमाणे त्यांनाही जमीन मिळवण्याचा हक्क असतांना त्यांची कोणीही दखल घेणारा नव्हता. त्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न महत्वाचा ठरतो. त्यासंबंधीची विशेष बाब म्हणजे शिखांना जमीन न मिळाल्यास डाके टाकणे, चोऱ्या करण्याच्या धमक्या शिख नेत्याकडुन देण्यात आल्या होत्या. तथापि अशा प्रकारची धमकी अनेक पिढया शोषित असतांनाही डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या वतीने या प्रसंगी किंवा

त्यापूर्वी कधीही दिलेली नव्हती. त्यामुळे डॉ. आंबेडकर हे शूर होते. परंतु कुरुर नसल्याचे सिध्द होते. त्यांनी आपले प्रत्येक कार्य, चळवळ मानवता आणि कायद्याच्या चौकटीतच तडीस नेले होते. पूर्व पंजाब मधील वरील निर्वासितांच्या समस्ये बरोबरच आणखी एका समस्येची माहिती डॉ. आंबेडकरांना झाली होती. त्या संबंधीच्या उपाय योजनाची विनंती सुध्दा पत्राद्वारे पं. नेहरुंना त्यांनी केली होती. ' पुर्व पंजाबातील सारा पध्दती प्रमाणे जमीनदार व कामिन असे शेतकऱ्यांचे दोन वर्ग होते, जमीनदार हे जमिनीचे संपूर्णतया मालिक असतात. कामिन यांना जमीन विकत घेण्याच हक्क नाही व ते जमिनीचे मालक कधीही होवू शकत नाहीत. त्यांची घरे ज्या जमिनीवर असतात त्या जमिनीचे मालक कधीही होवू शकत नाहीत. त्यांची घरे ज्या जमिनीवर असतात त्या मुळे कामिन हे जमीनदारांचे वंशपरंपरेने झालेले गुलाम होते व ते तसेच जीवन जगतात. जमिनदार कामिनांचे घरे उध्दस्त करु शकतो व त्यांना गावातून हाकलून देऊ शकतो, पूर्व पंजाबमधील अस्पृश्य लोक यांना कामीन म्हणून मानण्यात येते व त्यांचे जीवन जमीनदारांच्या कृपा कटाक्षावर अवलंबून असते, ज्या सारा पध्दतीमुळे हे अनिष्ट भेद नष्ट करावेत व त्यासाठी ती पध्दतच आमुलाग्र बदलून टाकावी आणि रयतवारी पध्दत अंमलात आणावी ,म्हणजे सर्व सर्व नागारिकांना समान दर्जा मिळेल व त्यांना जमीन विकत घेणे धारण करणे व विकणे याचे सर्व मालकी हक्क प्राप्त होतील, या संदर्भावरुन पूर्व पंजाबातील अस्पुश्यांचे रुढीच्या बंधनामुळे जाचक जीवन पध्दतीचे स्वरुप स्पष्ट होते.ही प्रथा कोकणातील तत्कालीन खोती पध्दती आणि अन्य प्रदेशातली अस्पृश्यता पध्दती यापेक्षाही अनेक पटीने भयानक असल्याचे स्पष्ट होते. कारण या पध्दतीमध्ये अस्पृश्यांना जमिनदारांचे केवळ गुलाम म्हणुनच जीवन जगावे अशीच ती पध्दत होती.या संबंधीचे अधिक सविस्तर माहिती असलेले डॉ.आंबेडकरांचे पं.नेहरु यांना लिहलेले मुळ पत्र खैरमोडे यांनी आंबेडकर चरित्राच्या खंड १० मध्ये दिलेले आहे. याशिवाय डॉ. आंबेडकरांच्या पत्राला पं.नेहरु यांनी दिलेल्या उत्तराचा मजकुर सुध्दा नमुद करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांनी सादर केलेल्या पत्रातील गंभीर समस्याचे स्वरुप मान्य करुन आवश्यक ते उपाय योजणार असे लिखित स्वरुपात उत्तर दिले होते. त्याच बरोबर असलेल्या अडथळ्यांची माहिती पं.नेहरुंनी नमूद केली होती. वरील समस्त तथ्यांच्या विश्लेषणावरुन हे स्पष्ट होते कि, भारताच्या भिन्न भिन्न प्रदेशात अस्पृश्य कामगारांच्या ,शेतमजुरांच्या समस्येचे स्वरुप भिन्न भिन्न आणि गुंतगुंतेचे होते. त्या संबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९९८ पासून शोषित पीडीतांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. शेवटी संविधान निमित्तींच्या माध्यमातून भारतातील सर्व नागरिकांना समान अधिकार असल्याचे नमुद केले.

......................********.................

# आसनांचा खेळाडुंच्या पायाच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामांचे चिकित्सक अध्ययन

डॉ.नानासाहेब सपकाळ
(शारिरिक शिक्षण संचालक )

प्रस्तावना : स्थिर सुखासनम् सुखावह असणाऱ्या स्थिर शरीरस्थितीला आसन असे म्हणतात. संस्कृतमधील आस या धातुपासून आसन हा शब्द निर्माण झालेला आहे. आस म्हणजे बैठक किंवा बसणे मात्र यामध्ये शरीराला यातना विरहित विशिष्ट स्थितीत विशिष्ट कालावधीपर्यंत ठेवणे अपेक्षित असते.योगशास्त्रानुसार शरीर स्वास्थ्यासाठी शरीरशुध्द करण्याच्या प्रक्रियेमध्ये शरीराला ज्या विविध विशिष्ट स्थितीत ठेवले जाते, त्याला योग असे म्हणतात. योगदर्शन या ग्रंथामध्ये महर्षी पतंजली यांनी यम,नियम,आसन,प्राणायाम, प्रत्याहर,धारणा,ध्यान व समाधी याला अष्टांग योग असे वर्णन केलेले आहे. सर्व साधारणपणे ,पद्मासन,सुखासन, भुजंगासन,हलासन,ताडासन, वृक्षासन,गोमुखासन, मार्जरासन, धनुरासन, पवनमुक्तासन, नौकासन,शवासन अशी अनेक आसने शरीरस्वास्थ्यासाठी प्रचलित आहेत. शरीर संवर्धनात्मक आसन,ध्यानात्मक आसन व विश्रांतीकर आसन असे आसनांचे उद्दिष्टानुसार वर्गीकरण करतात तसेच उभ्याने करावयाची आसने,बसुन करावयाची आसने व विश्रांतीकर आसन असे आसनांचे उद्दिष्टानुसार वर्गीकरण करतात तसेच उभ्याने करावयाची आसने, बसुन करावयाची आसने व झोपून करावयाची आसने असे सुध्दा आसनांचे वर्गीकरण केल्या जाते. आसनांच्या अनेक प्रकारापैकी ८४ आसने प्रमुख मानली जातात.

आसनाच्या नियमित अभ्यासाने पाठीचा कणा (मेरुदंड,मज्जारज्जु,मज्जापेशी, ज्ञानतंतू) यावर विशिष्ट प्रकारचा दाब (ताण) निर्माण होऊन संपुर्ण शरीरावर त्याचा इष्ट परिणाम साधल्या जातो.विविध आसने करतांना शरीराची ठेवण सुधारुन शरीर डौलदार,स्वस्थ,लवचिक,कार्यप्रवण,उत्साही बनते.

विषयाची गरज व महत्व :-

शारिरीक हालचाली विशिष्ट गतीने करण्याला क्रिडा क्षेत्रात फार महत्व आहे. त्यासाठी शरीराच्या सर्वच अवयवाची सुदृढता आवश्यक असते. योग्य आहार, योग्य शारिरीक हालचालीने नैसर्गिकरित्या शारिरीक सुदृढता मिळवता येते. खेळाडुंना सर्वच क्रिडा प्राविण्यता प्राप्त करण्यासाठी शरीराच्या स्नायुंची कार्यक्षमता चांगली असणे गरजेचे असते.खो-खो या खेळ प्रकारात खो देणे,गडयाचा धावून पाठलाग करणे आणि एक पाय दुमडुन दुसरा पाय जमिनीस टेकवून अशा विशिष्ट स्थितीत बसण्यासाठी शरीराची संपूर्ण भार तोलुन धरण्यासाठी पायाचा वापर जास्तीत जास्त करावा लागतो. त्यासाठी पायाच्या स्नायूंची ताकद व सहनशीलता भक्कम असणे आवश्यक असते. खो-खो या खेळात धावण्याचेच तंत्र व गती याला फार महत्व असते.

उद्दिष्टये : प्रस्तुत अध्ययनाची पुढील उद्दिष्टये ठरविण्यात आली.

१) खेळाडुंच्या दैनंदिन शारिरिक हालचालीचा आढावा घेणे.

२) खेळाडु स्वत:च्या खेळण्याव्यतिरिक्त कोणत्या व्यायाम प्रकाराचा अभ्यास करतात ते अभ्यासणे.

३) खेळाडु खेळ कौशल्यता वाढविण्यासाठी दक्ष आहेत का तपासणे.

४) खेळाडु नियमित आसनाच्या अभ्यासाला त्यांच्या दैनंदिन जीवनात स्थान देतात काय हे तपासणे.

परिकल्पना : १) आसनांच्या खेळाडुंच्या पायाच्या कार्यक्षमतेवर धनात्मक परिणाम होतो.

नियंत्रित घटक : प्रस्तुत अध्ययनाच्या पुढील परिसिमा ठरविण्यात आलेल्या आहेत.

१) हा लघुशोध निबं अकोला जिल्हा क्रिडा प्रबोधिनीच्या मैदानावर खेळाचा सराव करणाऱ्या खेळाडुं पुरताच मर्यादित आहे.

२) या अध्ययनासाठी फक्त खो-खो खेळाडुंचाच विचार केलेला आहे.

३) हे अध्ययन फक्त पुरुष खेळाडु पुरतेच मर्यादित आहे.

४) न्यादर्श खेळाडुंची वयोमर्यादा १६ ते २१ वर्ष एवढी मर्यादित केलेली आहे.

अनियंत्रित घटक : सदर अध्ययन करतांना संशोधकाचे काही घटकांवर नियंत्रण नव्हते.

१) खेळाडुंच्या आहार या घटकावर नियंत्रण नव्हे

२) खेळाडुंच्या आनुवंशिकतेचा विचार केलेला नाही.

न्यादर्श निवड : प्रस्तुत अध्ययनामध्ये खेळाडुंचा पायाच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या नियमित आसनांच्या परिणामाचे चिकित्सक अध्ययन करण्यासाठी अकोला जिल्हा क्रिडा प्रबोधिनीच्या मैदानावर खो-खो या खेळाचा सराव करणाऱ्या मैदानावर ५० (पन्नास) खेळाडूंची निवड नमुना निवड पध्दतीच्या लॉटरी पध्दतीने करण्यात आली. खेळाडुंच्या पायाची कार्यक्षमता तपासणीसाठी खो-खो खेळाडुं अॅप्स व ५० मि.धावा काढणे लांब उडी,दंड बैठका अशा तीन खेळ प्रकार घेवून त्यांच्या नोंदी घेण्यात आल्या त्या खालील प्रमाणे

सारणी क्र. ०१

खेळाडुंनी काढलेल्या दंड बैठका दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | खेळाडुंचे विश्लेषण | दंड बैठका (मध्यमापन) |
|---|---|---|
| ०१ | आसनांचा नियमित सराव करणारे खेळाडू | ३० |
| ०२ | आसनांचा नियमित सराव करणारे | १३ |

वरिल सारणी क्र.०१ चे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की आसनांचा नियमित सराव करणाऱ्या खेळाडूंनी काढलेल्या दंडबैठाचे मध्यमान ३० असुन आसनांचा सराव न करणाऱ्या खेळाडुंनी काढलेल्या दंड बैठका आसनांचा सराव करणाऱ्या खेळाडुंनी काढलेल्या दंड बैठका जास्त आहे. यावरुन आसनांच्या सरावामुळे जास्त दंड बैठका काढून पायाच्या कार्यक्षमता जास्त आहे हे सिध्द आहे.

सारणी क्र. ०२
खेळाडुंनी काढलेल्या लांब उडीच्या नोंदी दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | खेळाडुंचे विश्लेषण | लांब उडी (मध्यमान) |
|---|---|---|
| ०१ | आसनाचा नियमित सराव करणारे | २.२० |
| ०२ | आसनांचा नियमित सराव न करणारे | १.१० |

वरील सारणी क्र. ०२ चे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की आसनांचा सराव करणाऱ्या खेळाडुंनी लांब उडीचे मध्यमान २.२० मी असुन आसन करणाऱ्या खेळाडुंच्या लांब उडीचे मध्यमान १.१२ मी एवढे आहे. म्हणजे आसनांचा सराव करणाऱ्या खेळाडुंनी लांब उडी चे मध्यमान आसनाचा सराव न करणाऱ्या खेळाडुंनी काढलेल्या लांब उडीच्या मध्यमानापेक्षा जास्त आहे. यावरुन आसनांचा सराव करणाऱ्या खेळाडुंच्या पायाची कार्यक्षमतेपेक्षा जास्त आहे. हे सिध्द होते.

सारणी क्र. ०३
खेळाडुंच्या ५० मीटर धावांची नोंद दर्शक सारणी

| अ.क्र. | खेळाडुंचे विश्लेषण | धावा (मध्यमान) |
|---|---|---|
| ०१ | आसनांच्या नियमित सराव करणारे | १२ |
| ०२ | आसनांचा नियमित सराव न करणारो | ३८ |

वरील सारणी क्र. ०३ चे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, आसनांचा नियमित सराव न करणाऱ्या खेळाडूंनी काढलेल्या ५० मीटर धावांचे मध्यमान १२ (सेंकद) असुन आसनांचा सराव न करणाऱ्या खेळाडुंनी काढलेल्या ५० मीटर धावांचे मध्यमान ३८ (सेंकद) एवढे आहे. म्हणजे आसनांचा सराव करणाऱ्या खो-खो खेळाडुंनी काढलेल्या ५० मीटर धावांचे मध्यमान कमी असून आसनांचा सराव न करणाऱ्या खो-खो खेळाडुंच्या ५० मीटर धावांचे मध्यमान जास्त आहे. यावरुन आसनांच्या खो-खो खेळाडुंनी कमी वेळात ५० मी धावा काढून पायाची कार्यक्षमता आसनांचा सराव न करणाऱ्या खो-खो खेळाडुंच्या पायाच्या कार्यक्षमतेपेक्षा जास्त आहे हे सिध्द होते.

निष्कर्ष : सदर अध्ययनातुन मिळालेले निष्कर्ष

१) आसनांचा खेळाडुंच्या पायाच्या लवचिकतेवर धनात्मक परिणाम होतो.
२) आसनांच्या नियमित सरावामुळे खेळाडूंच्या शारिरिक श्रम व स्फुतीवर धनात्मक परिणाम होतो.

संदर्भ : १) गांगुली एस.के.इफेक्ट ऑफ योगिक ट्रेनिंग ऑन द फिजिकल फिटनेस -योगमिमांसा - २००६ पुणे
२) जान्सन टी - द ॲडोव्हर फिजिकल फिटनेस रोस्टिंग प्रोग्राम -१९९८
३) देवतळे व.ग. -योगासने १९८४

# छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ

प्रा.सुनील म.मनवर
(इतिहास विभाग प्रमुख)

छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्वराज्याच्या स्थापने बरोबरा स्वराज्याचा कारभार देखील तेवढाच महत्वाचा आहे. शिवाजी महाराज स्वराज्य स्थापून थांबले नाही तर सुराज्य झाले पाहिजे यासाठी कसोशीने व जानीने प्रत्यन केले. राज्य कायद्याचे, न्यायाचे असावे यावर शिवाजी महाराजांचा कटाक्ष असे. राज्यामध्ये शांतता,सुव्यवस्था, राहण्याची महाराज काळजी घेत. त्या दृष्टीने तत्कालीन परिस्थिती विचारात घेवून त्यांनी अष्टप्रधान मंडळ स्थापन केले.

१) पेशवा : हा अष्टप्रधान मंडळाचा प्रमुख होता. राज्यातील पूर्ण कार्यांची देखरेख करणे, लोकल्याणा कडे लक्ष देणे पेशव्याचे काम होते. राज्याच्या गैरहजेरीत राज्याची दबाबदारी पेशव्याकडेच राहत असे. या पदावर मोरोपंत पिंगळे हे होते.

२)अमात्य (मुजुमदार): राज्याचा जमा खर्च व हिशोब ठेवण्याचे कार्य म्हणजे अर्थमंत्री या पदावर रामचंद्र निळकंठ हे होते.

३) मंत्री : राजा सुरक्षितेच्या दृष्टीने त्यांच्या दैनंदिन कामाकडे बारकाईने लक्ष ठेवणे मंत्री यांची जबाबदारी होती. त्यातच राजाला भेटणाऱ्यांची यादी तयार करणे. राजाच्या खाण्यापिण्याच्या वस्तुचे निरिक्षण करणे इत्यादी कामाचा समावेश होता. ही जबाबदारी दत्ताजी त्र्यंबक कडे होती.

४) सचिव : राजपत्राचे काम, नव्याने जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावणे, युध्दकालीन कामकाज पाहणे, वेळप्रसंगी युध्दावर जाणे या पदावर अन्नाजी दत्तो हा होता.

५) सेनापती : हा संपुर्ण लष्कराचा प्रमुख होता. त्या दृष्टीने सैनिकाची भरती करणे, त्याच्या प्रशिक्षणाची, शस्त्रअस्त्राची व्यवस्था करणे, सैन्यात शिस्त राखणे, महत्वाच्या युध्द मोहिमेचे नेतृत्व करणे ही अत्यंत महत्वाची कामे सेनापतीकडे होती. शत्रुशी लढुन स्वराज्य संस्थापनेचा तो काळ असल्याने या पदाला अनन्य साधारण महत्व होते. हे महत्वपुर्ण पद मानकोजी दहातोंडे, नेताजी पालकर,प्रतापराव गुजर यांनी विभूषित केले. शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकासमयी हंबीरराव मोहिते हा सेनापती होता.

६) पंडीतराव : विद्वानाचा सत्कार करणे, त्यांना दानधर्म करणे, धर्म-जतिसंबंधि तंटयाचा निकाल देणे ही कामे होती. या पदावर रघुनाथ पंडीत होता.

७) न्यायधिश : संपूर्ण न्यायदानाचे कार्य न्यायालयीन व्यवस्था पाहणे, या पदावर निराजेरावजी होता.

८) सुमंत (डबीर ) :परराज्याशी होणाऱ्या, युध्द,तह कराराबाबत राजाला सल्ला देणे हे महत्वाचे कार्य होते.परकिय वकीलाच्या हालचालीवर देखरेख ठेवणे, हेरा मार्फत परराज्यातील बातम्या मिळविणे. सुमंत म्हणजे राज्याचा परराष्ट्रमंत्री होय, रामचंद्र त्र्यंबक या पदावर होता. पेशव्याला वार्षिक पंधरा हजार होन (रुपये) ,अमत्याला बारा हजार होन (रुपये) इतर मंत्र्यांना दहा हजार होन (रुपये) वेतन मिळत असे. मंत्र्यांची नियुक्ती,बढती, निवृत्ती सर्व अधिकार राजाच्या हाती असत. पंडीतराव व न्यायाधिशांचा अपवाद वगळता सर्व मंत्री युध्द मोहिमात भाग घेत असत. शिवाजी महाराजांच्या मंत्रीमंडळाचे वैशिष्टये म्हणजे मंत्रीपद वंशपरंपरेने न देता योग्यता व कर्तृत्व पाहुनच दिले. हे त्यांच्या अष्टप्रधान मंडळाचे महत्वाचे वैशिष्टये ठरते.

# Importance of Yoga and Pranayam

**Mr. Ramkrushana N. Gawande**
Asst. Professor ( HOD –ENGLISH)

Pranayama or breath control is a main component of Yoga, It's frequently practiced with yoga postures and meditation. The goal of Pranayama is to strengthen the connection between your body and mind. According to research , pranayama can promote relaxation and mindfulness yoga helps in reducing stress level and tension in the physical body. It helps in the attainment of perfect harmony . It helps in weight loss. It increases flexibility and muscle strength . As an as and pranayama balances the body temperature as well as cleanses the nadirs in your body. It relieves stress and improves blood circulation and removes toxins from body, sinus problems as well as allergy problems can be cured by pranayama.

Breathing deeply in yoga can actually help you avoid injury.Deep breathing can also allow us to experience our true essence .The flow that the steady in and out action of breathing credits stimulates a transformation in the body and mind, purifying and cleansing them so that our true essence shines forth.

Yoga can boost self esteem and confidence yoga helps to in still confidence and to bring learning to children on an experimental level ,Yoga teachers them to be patient and work towards their goals. Yoga also provides tools for practicing compassion , mindfulness generosity ,focus, strength and flexibility.

It is recommended to do pranayama early in the morning one to two hours before sunrise when oxygen content is maximum in the air. Also, early morning body is fresh and mind is clear from any thought processes. An empty stomach is idea for pranayama. Early morning food consumed during previous day is digested .Due to pranayama, especially Kapalbhati pranayama helps to clear mucus in the air passages, relieve congestion reduce bloating and improve lung capacity. Physical body in positions that cultivate awareness,relaxation and concentration So do yoga and pranayama everyday regularly and be fit mentally and physically.

# आदिवासी जमातीची उत्पत्ती

डॉ.अनिल के. ठाकरे
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)

आदिवासी :

आर्यांचे हिंदुस्थानात आगमन होण्यापुर्वी ' आदिवासी ' हे या देशाचे मुळ रहिवाशी होते त्या काळी आदिवासी टोळ्या-टोळ्यांनी राहत होते. आर्यांनी हिंदुस्थान काबीज केल्यावर या टोळ्यांपैकी पुष्कळ टोळ्या आर्य लोकांशी समरस झाल्या.काही टोळ्या पराभूत होवुन तर काही टोळ्या स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी दऱ्याखोऱ्याच्या व जंगलाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. भारतातील आदिवासींना त्यामुळे ' गिरीजन' असे म्हटले जाते. मुळचे ते याच भूमीवरचे असल्यामुळे त्यांना ' भूमिजन' किंवा ' भूमीपुत्र' असे देखील म्हणतात. नेहमी अरण्यात राहणारे म्हणून ' अरण्यके' असेही त्यांना संबोधण्यात येते.भारतीय संविधानाने त्यांना अनुसुचित जमाती म्हणजेच ' आदिवासी' किंवा ' अदिम जाती ' संबोधिले आहे.

इंग्रजांची राजवट येईपर्यंत आदिवासी जमातीच्या स्वतंत्र कारभारात कोणी ढवळाढवळ केली नव्हती. त्याचा हव्यासही कोणाला वाटला नाही. तसेच आपल्यावर दुसरे कोणीतरी लोक राज्य करतात याची शंकाही त्यांच्या मनाला शिवली नाही. इंग्रजांची राजवट सुरु झाल्यावर ही परिस्थिती बदलु लागली. धर्मोपदेशकांची पथके धर्मप्रचारासाठी आदिवासी भागात फिरु लागली. धर्म प्रचार आपण प्रसाराबरोबरच मानवतेच्या भावनेने आदिवासींची सेवा करण्यास त्यांनी प्रारंभ केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या पाठोपाठ मानवंशशास्त्रज्ञ, जनगणना करणारे व इतर सरकारी अधिकारी पथके या ना त्या कामासाठी आदिवासी विभागात फिरु लागली. शिरगणती करणाऱ्या त्यावेळच्या अधिकाऱ्यांना आदिवासी गणना कोणत्या धर्मात करावी त्यांना काय म्हणावे असा प्रश्न पडत असे. हिंदुस्थानचे जरी ते मुळ रहिवाशी होते. तरी हिंदु धर्मात त्यांचा समावेश नव्हता. ते हिंदुच आहे असे त्यांना कोणी मानले नव्हते. हिंदु धर्माच्या चातुर्वर्ण्य समाजपध्दतीतही त्यांचा समावेश झालेला नव्हता. त्यांना शुद्र म्हणावे तर हिंदुधर्मातील शूद्र गणलेल्या लोकांसारखी त्यांची स्थिती नव्हती. कारण शुद्रांचा सबंध ''हिंदुधर्माचार, शुध्दाशुध्द, कर्मवाद ,पापपुण्यादी कल्पनांशी '' निगडीत होता. आदिवासींचे सांस्कृतिक आणि धार्मिक जीवन हिंदूपेक्षा वेगळे होते. त्यामुळे ब्रिटीश शिरगणती अधिकाऱ्यांनी त्यांची गणना ' प्राणीपूजक' म्हणून केली. पुढे कालांतराने हिंदू समाज आणि आदिवासी यांची सामाजिक व सांस्कृतिक देवाणघेवाण वाढली त्यांचे हिंदूकरण होवू लागले. हिंदू समाज व आदिवासी यांच्यातील अंतर कमी होऊ लागले. त्यामुळे त्यांना ' हिंदूधर्माचा आचार करणाऱ्या वन्य जमाती ' असे संबोधण्यात येवू लागले. त्यानंतरच्या काळात त्यांचा '

वन्य जमाती',' पहाडी टोळ्या' तर कधी कधी ' मागासलेले हिंदु' असा उल्लेख होऊ लागला '

इंग्रजीमधील ' ढीळलशी ' या शब्दाचा अर्थ 'जमात' असा होतो.आदिपासून किंवा सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होय. असा अर्थ सर्व सामान्य लोकांमध्ये रुढ झाला आहे. त्यामुळेच जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. डॉ. व्हेरियर एल्विन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना ' अलीेळसळपरश्र ' असे संबोधले आहे. ' अलीेळसरश्र ' याचा अर्थ 'मुळचे निवासी ' असा होतो. आदिवासी हे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहतात म्हणुन त्यांना 'वन्य जमाती' किंवा ' गिरीजन ' असे ही म्हटले जाते. आदिवासी हे या देशातील मुळचे रहिवाशी आहेत. म्हणुन त्यांना ' वनवासी', ' गिरीजन' म्हणणे योग्य नाही ते खऱ्या अर्थाने या देशाचे आदिवासी म्हणजेच मुळचे निवासी आहेत. भारतीय संविधानात आदिवासींना ' अनुसुचित जमाती' असे म्हटले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४२(१) अनुसार ज्याचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला आहे. त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात.

आदिवासी क्षेत्र आज ही अत्यंत दारिद्रय, निरक्षरता व शोषण यांचा गड मानला जातो. ८५ % लोक आजही दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात ७१ % आदिवासी लोक निरक्षर आहे. यापैकी बहुतांश लोक उपभोग्य अर्थव्यवस्थेवर जगत आहे.भारतीय संविधानातील आर्टिकल ३४२ नुसार अनुसुचित जमातींचे रक्षण करण्यासाठी १८५६ ई. मध्ये एक सुची तयार करण्यात आली आहे. त्याला '' शेडयुल ट्राईब्स '' लिस्टस् माडिफीकेशन ऑर्डर १८५६ ''असे म्हणतात. अध्यादेश ७१४ नुसार जमाती व उपजमाती असा फरक करण्यात आला असून त्यानुसार आज भारतात ५५० जमाती वास्तव्य करतात त्यांना भारतीय राज्यघटनेने अनुस,चित जमाती असे संबोधले आहे.

...............************...................

## अक्षर धन

आचार विचार हीच घराची आखणी प्रमे घराचा पाया होय ।। थोर माणसे घराच्या भिती । सुख हेच घराचे छत होय ।। जिव्हाळा हा घराचा कळस । माणुसकी हीच घराची तिजोरी ।। गोड शब्द घराची धन–दौलत । शांतता हीच लक्ष्मी होय ।। आत्मा हाच घराचा विश्वास । घर हेच देवस्थान होय ।। दुजाभाव विसरणे हीच घराची तेजस्वी समई । पैसा घराचा पाहुणा । गर्विष्टपणा घराचा वैरी । नम्रता ही घराची प्राणप्रतिष्ठा होय । व्यवस्था हीच घराची शोभा । चरित्र्य हीच घराची किर्ती होय । सदाचार हाच घराचा सुगंध । समाधान हेच घराचे सुख होय । अशा घरातच जागृती व सुनिनी । हरि ओम नमो शिवाय । आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावा परमार्थ विवेका । येथे आळस करु नका, विवेकी व्हा । प्रपंच साधुनी परमार्थ । तेणे तुम्ही सुखी व्हाल । प्रपंच परमार्थ सजिव कराल । तर तुम्ही विवेकी व्हा । श्री स्वामी समर्थ ।।

– श्री भाऊराव महल्ले

## सुखी संसाराचे रहस्य

केवळ आपुल्या स्वार्थासाठी । कलह नसावा घरामध्ये ।।
आपुलकीच्या नात्यामधुनी । स्नेह जपावा मनामध्ये ।।
येणाऱ्याला पाणी द्यावे । मुखात वाणी गोड हवी ।।
जाणाऱ्याच्या मनात फिरुनी । येण्यासाठी ओढ हवी ।।
ऐसा प्रेमळ माणुसकीचा । झरा वहाता मनामध्ये ।।
भांडयाला लागतेच भांडे । विसरुनी जावे क्षणामध्ये ।।
परस्परांना समजुन घ्यावे । अढी नसावी मनामध्ये ।।
रुसवे फुगवे नको फुलाचे । मोह रहावा मनामध्ये ।।
नित्य काळजी घरात घ्यावी । वय झालेल्या पानांची ।।
ज्याला त्याला द्यावी जागा । वयाप्रमाणे मानाची ।।
एकमताने निर्णय घ्यावा । नको दुरावा मनामध्ये ।।
लढा जिव्हाळा आंत असावा । नको उमाळश वरकरणी ।।
नको घराला गर्व । लिन राहावे प्रभुचरणी ।।
दिवसा रात्री परमेश्वराचा । वास असावा घरामध्ये ।।

– श्री भाऊराव महल्ले

# मेरा एन.एस.एस.का सफर .....

N.S.S.में शामिल होणे एक ही उद्देश मन में था कि जब एक विषय गॉप रह जायेगा। ता`एन.एस. एस. के पाच मार्ककम हो जायेगे बस यही एक उद्देश से मैं एन.एस.एस. में शामिल हुई थी । जब सही मायने में कॉलेज मे एन.एस.एस. के कार्यक्रम शुरु हो ये जैसे की गांव में से रॅली निकालना, गाव साफ करना कॉलेज में कार्यक्रम लेना उस में से सामने आना कभी सुत्रसंचालन करना, कभी आभार प्रदर्शन करना, कभी प्रास्तविक करना तो कमी भाषण भी देना और हो सभा करते -करते खुद में एक अलगही सेल्फ-कॉन्फीडरन्स निर्माण होना और जब कार्यकम खतम हो जाये तो फिर ‘ फडणीस सर ’ देते, केले और बिस्कीट का नाश्ता बढे मजेसे करते.

और जब जनवरी महिना आते ही कॅम्प में जाने कि तयारी में लगना ना और कॅम्प में जाने के लिये ‘‘ ॲडमिशन्स ’’ लिया उस दिन से हि कॅम्प में जाने के लिये परमिशन लेते रहना और जब कॅम्प में जाना सुबह उठ कर ५ बजे योगा करना बाद में गांव साफ करना फिर नाश्ता करना और फिर बंधारा बनाने को जाना बंधारा बनाते समय,पोते भरणा,पोते सिना, खोदना या सब करते समय सेल्फी निकालना ओर लडको से दाट भी खाना ,काम करना ‘‘ फोटो नंतर काढा ’’, बडी माजा आती थी । और हमारे दो,‘‘ कोल्ड वॉर ’’ रागु नका ,कोणाला, और ‘ राग आला ’ कुछ भी हुआ तो हम यह शब्द वापरते थे । कॅम्प में चहा नही मिलता है ना तो फिर सर और मॅडम के नजर चुकी ‘ वेशु के गर, पर चहा पिने लिये बढे शान से जान क्यु कॅम्प में सिर्फ मुझे ओर प्रतिक्षा को नही चहा मिला करती पडे थी और सब के साथ बैठकर खाना खाना ओर जब कॅम्प मे गावावाले लोगों के लिए नेत्रतपासणी का कॅम्प या उस दिन तो सभी गावावाले से मिळने का मौका मिला और उनसे जान पहचान बडी और आज भी जब गाव के लोग मिलते है तो बडे ही चार से बाढ करते है ।

यह कॅम्प के ७ दिन में जो सिकने मिला वह राम दही ही दुनिया के को भी युनिव्हलर्स में मिले गा.ओर जो काम घर पर कभी नही किया वह काम यह कॅम्प में बढे शासन से किया, और रोज बौध्दिक सच के द्वारान रोज कुछ नया सिखने को मिला और कुछ नया करने की उमीद एक नया कॉनफिक्डेन्स ‘ साबु मॅडम , से मिलकर मिला और जब एन.एस.एस. के कॅम्प का आखरी दिन था तब लगा काश एन.एस.एस. का कॅम्प १० दिनों का होता तो ओर किचना नया सिखने मिलता.

ओर फिर आगे एन.एस.एस. के थी ही मुझे अमरावती में हुये ‘‘ महिला सक्षमीकरण ’’ के दोन दिन के कार्यशाला में जाने का मौका मिला और उसे में नऊ व्याख्यान हुये उसमें मुझे सबसे ज्यादा चींर्ळीरींश करने वाला व्याख्यान ‘ गणेशवाला मॅडम ’ का लगा और ‘ मिरा कांबळे और गणेडीवाल मॅडम से मुझे यह ध्यान में आय की परिस्थिती कैसी भी हो उसमे से रास्ता निकल ही जाता है ’ तुम कहा पर उसे ज्यादा यह बात खर्ाींीरिपीं है तुम कैसे पढे, ओर एक नई बात समझ आई की शादी के बात भी करीयर बन सकता है । यह सब मुझे गणेडीवाल मॅडम से मिलने के बाद समझ आया जब की में समझती दिदी की शादी के बाद ही जिंदगी है । एस.एस.एस. में तीन साल पुरे करने के बाद ध्यान में आया एन.एस.एस. सिर्फ ५-६ मार्क गॅप रहे विषय निकालने से ज्यादा पुरे जिंदगी के लिए एक सिख मिलती है । एक ऊेषळवरपलश मिलता है । कुछ कर दिखाने कि उमीद जगती है ।

कु.रोशनी संजय जयस्वाल
बी.ए. भाग -३

# महाराष्ट्राचे राष्ट्र विकासात योगदान

महाराष्ट्राचा आज पर्यंत पुष्कळ विकास झालेला आहे. त्यामध्ये नेत्यांनी संतांनी राष्ट्र विकासासाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे. यामध्ये विनोबा भावे, राष्ट्र संत तुकडोजी महाराज, गाडगे बाबा व माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण,माननीय वसंत दादा पाटील, शंकरराव चव्हाण वसंतराव नाईक या सर्वांनी महाराष्ट्राचा विकास होण्यासाठी प्रयत्न करुन महाराष्ट्र प्रगतीची वाटचाल चालु आहे. उदा,मोठ्या नदीवर धरण बांधून ओलितांचे क्षेत्र वाढविले शहराच्या विकास होण्यासाठी (एम.आय.डी.सी) औद्योगिक प्रगती करुन शहराचा विकास वाढविला आहे.

तसेच महाराष्ट्राची जडणघडण समाज सुधारकांनी घडवली व त्या समाजसुधारकांचे बहुमुल्य योगदान राष्ट्र उभारणीत लाभले १८२३ साली लोकहितवादी जन्मले आणि प्रबोधनकार निधन पावले १९७३ साली दिडशे वर्ष विवेकी विचाराचा कृतीशील जय घोष या कालखंडात निर्माण झालेले सर्व समाजसुधारक करत होते. अशी लखलखीत परंपरा भारतातील अन्य कोणत्याही राज्याला लाभलेली नाही.असे हे महाराष्ट्र राज्य. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती.त्या काळात आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना ज्योतिबांनी स्वत: शिक्षण दिले व देशातील आद्य शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणुन सावित्रीबाईचे योगदान स्त्रियासा ही फार मोलाचे ठरले आहे आणि आज आपण बघतोच की प्रत्येक क्षेत्रात स्त्री आहे. देशाच्या राष्ट्रपती पासुन तर गावाच्या सरपंचा पर्यंत असा हा आदर्श महाराष्ट्राचा संपुर्ण देशात आगळा-वेगळा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या वीस वर्षात भारतात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले प्रखर देशभक्तीची भावना भारतात जोर धरु लागली विष्णुशास्त्री चिपळुणकर,लोकमान्य टिळक यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी चळवळ उभारली, तर गोपाल गणेश आगरकर यांनी '' सामाजिक सुधारणा आधी '' यासाठी लढा चालु केला. दोघांचेही विचार प्रवाह भिन्न असले तरी अंतिम ध्येय एकच होते. व ते म्हणजे शिक्षण व लोक जागृती द्वारा अखील समाजाचे सर्वांगीण उद्धाटन करणे.अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत ज्योतिबा फुलेंनी आपले कार्य सुरु केले. त्या काळात जातीभेद-कर्मकांड शिगेस पोचले होते. अस्पृश्याचा स्पर्शच काय पण सावलीही वर्ज्य होती. बालविवाह प्रथा, विधवांचे केशवपण,बालहत्या होत होत्या.

धार्मिक अंधश्रध्दा,धातृक, सामाजिक चालीरीती,शुद्राची उच्चवर्णीयांकडुन होणारी पिळवणुक, या सर्वाविरुध्द ज्योतीरावांनी आवाज उठविला. एवढेच नव्हे तर समस्या सोडविण्यासाठी अविश्रांत परिश्रम केले व देशात नवक्रांती घडवून आणण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र हि संताची भुमी आहे. असे म्हटल्यास चूक होणार नाही .कारण नामदेव,ज्ञानेश्वर, एकनाथ तुकाराम,रामदास आणि अनेक संतानी या मायभूमीत जन्म घेतला व भागवत धर्माचे मंदिर उभारुन जन-जागृती केली. '' बुडतसे जन पाहावेना डोळा '' म्हणून कळवळा येत असे ''

या वृत्तीने सर्व संतांनी समाज जागृतीसाठी प्रयत्न केलेत त्यांत काही निवृत्तीपर तर काही प्रवृत्ती पर संत होते. राष्ट्रसंत तुकोडोजी महाराज हे प्रवृत्ती पर संत होते. १९३० च्या सत्याग्रही शिबीरातून त्यांची राष्ट्रीय भजने गाजली. १९३६ साली महात्मा गांधीनी त्यांना महीनाभर आग्रहाने स्वत:जवळ ठेवून घेतले होते. म्हणून ते राष्ट्रसंत म्हणून नावारुपास आले. याप्रमाणे राष्ट्रउभारणीत महाराष्ट्राचे योगदान लाभले आहे.

समाजसुधारकांचा उज्वल वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात सुवर्ण महोत्सवी वर्षातच हा वारसा, पराभूत होत आहे. याची वेदना आपणापर्यंत पोहचविणे म्हणजे सत्य समोर आणणे होय. अशा प्रकारे संताच्या आशीर्वादाने आणि माननिय नेत्यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्राचे राष्ट्र विकासात योगदान लाभलेले आहे.

दत्ता हनुमान सदाफळे
बी.ए. भाग -२

# विसरत चालेला बाप

वडील । बाबा । पप्पा । डॅड । पिता । ,पालक लिहण्याला बोलण्याला खुप चांगल वाटतं आपण प्रत्येकजण सहजपणे नेहमी शब्द उच्चारतो तो म्हणजे बाप,आई घराचं मांगल्य असते तर पाब घराचं अस्तीत्व पण खरंच या अस्तीत्वाला आम्ही कधी समजून घेतलं नाही का ? वडीलाला महत्व असूनही त्यांच्या विषयी जास्त बोलल्या जात नाही, लिहल्या जात नाही कोणताही व्याख्याता आई विषयी जास्त बोलतो संत महात्म्यांनी आईच महत्व जास्त सांगितले आहे. चांगल्या गोष्टींना आईची उपमा दिली आहे.

काही लोकांनी बाप रेखाटलापण तो ही तापड,व्यसनी,मारझोड करणारा समाजात १० % बाप असे असतीलही पण चांगल्या वडीलांबद्दल काही आईकडे अंश्रुंचे पाय असतात पण बापाकडे संयमाचे घाट असतात आई रडून मोकळी होते पण बापाला रडत येत नाही कारण जास्त ताण बापावरच असतो.कारण समई पेक्षार ज्योतीच जास्त तपते ना, पण श्रेय मात्र सर्मईलाच मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते. पण संपूर्ण जीवनाची शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरुन जातो आई रडत पण वडिलांना रडता येत नाही स्वत:चा बाप वारला तर रडता येत नाही. कारण छोट्या भावंडाचा सांभाळ करायचा असतो. आई मेली तरीही रडता येत नाही कारण बहिणीचा आधार व्हायचा असतो. शिवाजी जीजाबाईंनी घडवीला त्या वेळी शहाजी लक्षात ठेवावा. देवकी आणि यशोधेचं कौतुक कराव पण तो पुरातून बाळ डोक्यावर घेवून जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा. राम हा कौशल्याचा पुत्र होता पण युध्दात मरुन पावलेला तो बाप राजा दशरथ होता. मुलाला पॅन्ट घेतो, मुलीला गावून घेणे पण स्वत: मात्र वापरायला जुनी कपडी काढते. मुलगा रुपये खर्च करतो, मुलगी ब्युटीपार्लर मध्ये १०० रु. खर्च करते, पण त्याच घरातला बाप दाढीचा टयुब संपला म्हणुन अंघोळीच्या साबणीने दाढी करतो.बाप आजारी पडला पण पटकन दवाखान्यात जात नाही. तो आजाराला मुळीच घाबरत नाही .पण डॉक्टर एखादा महिना आराम करायला सांगेल याची त्याला भिती असते. कारण पोरीचं लग्न आणि पोराचं शिक्षण बाकी असतं. घरात उत्पन्नाचं साधन नसतं तरीही मुलाला मेडीकल, इंजिनियरींगला ॲडमिशन देवुन शिकवतो दर महिण्याला त्याला पैसे पाठविले जातात. पण सर्वच नसली तरीही काही मुलं अशी असतात की ते पैसे येताचं मुलांना, मित्रांना क्लब मध्ये पार्ट्या देतात. एकमेकांना बापाच्या नावावरून चिडवतात. ज्या घरात बाप आहे त्या घराकडे कोणी बघत नाही,कारण घरातला कर्ता जीवंत असतो. तो जरी काही करत नसला तरीही तो त्यांच्या पदावर असतो कोणाचा मुलगा होणं टाळता येतं पण बाप होणं टाळता येत नाही . परिक्षेचा निकाल लागल्यावर आई आमच्या लक्षात राहते कारण तीर कवेत घेते, कौतुक करते पण तोच ,तोच गुपचुप जावून पेढे आणणारा बाप आमच्या लक्षात राहत नाही. चटका बसला, फटका बसला ,ठेच लागली तर आई गं...... हाच शब्द बाहेर पडतो पण एखाद्या वेळेस हायवे क्रॉस करतांना एखादा ॲक्सीडेंट झाला तर बाप रे ! हेच शब्द बाहेर पडतात कारण छोटया छोट्या संकटांना आई चालते पण मोठ्या प्रसंगाला बापचं आठवतो तरुण मुलगा आला नाही याची वाट बघत आई नाही बापचं असतो, मुलाच्या नौकरी साठी हात पसरवणारा बाप, मुलीच्या लग्नासाठी उंबरठा झिजवणारा बाप घरच किती ग्रेट असतो ना ! वडीलांच महत्व कोणाला कळंत लहानपणीच वडील गेले त्या मुलांवर अनेक जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. त्यांना एकएका वस्तुसाठी तरसावं लागतं. पण वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेतात त्या मुली सासरी गेलेल्या अथवा घरापासून दुर असलेल्या मुलीला बापाशी फोनवर बोलतांना बापाचा बदललेला आवाज एका क्षणात कळतो मग ती अनेक प्रश्न विचारते कोणतीही मुलगी स्वत:च्या आशा,आकांक्षा बाजुला ठेवून बाप म्हणेल तेव्हा लग्नाला तयार होते ,कारण ती बापाला जाणते समजून घेते. इतरांनीही आपल्याला समजून घ्यावं हीच बापाची अपेक्षा असते.

कु.भाग्यश्री बा.मुळे
बी.ए.भाग –१

# बेटी की पुकार

बेटी ये कोख से बोल रही
माँ करदे तू मुझ पे उपकार
मत मार मुझे जीवन दे दे
मुझ को भी देखने दे संसार



बिन मेरे माँ तूम भैय्या को
राखी किससे बंधताओगी
मरती रही कोख की हर बेटी
तो बहु कँहा से लाओगे
बेटी ही बहन बेटी दुल्हन बेटी से
होता परिपार
मत मार मुझे जीवन देदे
मुझ को भी देखने दे संसार

.

मानेंगे पापा भी अब माँ
तुम बात बता के देखो तो
दादी नारी तूम भी नारी
सबको समझा के देखो तो
बिन नारी प्रित अधुरी है
नारी बिन सुना है घर–बार
मत मार मुझे जीवन देदे
मुझको भी देखने दे संसार

नही जानती मै इस दुनिया को
मैने जाना माँ बस तुमको
मुझे पत्ता मुझे है फिकर मेरी
तू मार नही सकती मुझको
फिर क्यु इतनी मजबुर है तू
माँ वसु है तू इतनी लाचार
मत मार मुझे जीवन देदे
मुझखशे भी देखने दे संसार

गर मै न हुई तो माँ फिर तू
कैसे दिल की बात बतारगी
मतलब की इस दुनिया में माँ
तु घुट घुट के राह जायगी
बेटी ही समझे माँ का इस
अकुंश करलो बेटी ये प्यार
मत मार मुझे जीवन देदे
मुझको भी देखन दे संसार
बेटी ये काखे से बोल रही
माँ कर दे तू मुझपे उपकार

**कु.तेजस्विनी हातोलकर**
बी.ए.भाग -१

## एक मैत्रीण असावी

न बोलता मनातलं ओळखणारी
सुख दुखा:त समान साथ देणारी
चुकलं तर खडसावून सांगणारी
आपल्यासाठी अख्या  जगाशी भांडणारी
आपल्याला गुणदोषांसह स्वीकारणारी
आपले सिक्रेटस् स्वत:च्या सिक्रेटससारखी
जपणारी
लाखोंच्या गर्दीत  आपला आवाज ओळखणारी
मोठ्या बहिणीसारखे आपले लाड करणारी
कधी लहान होवुन आपल्यावर चिडणारी
लेक्चर मिस्ड केलं तर ओरडणारी
आपल्याबद्दल पझेसीव व प्रोटेक्टीव्ह असणारी
भांड–भांड भांडून सॉरी म्हणणारी
जिवलगा पेक्षा जिवलग असणारी
आपली मितवा,Fu, तु हिरे असणारी
Every Day ला Friendship Day बनवणारी
स्वत:पेक्षा जास्त आपल्याला समजणारी
खरच असावी अशी एक मैत्रीण

## न्याय मिळालाच पाहिजे

तिला जसं भर रस्त्यात जिवंत जाळलं
तिच्या गुन्हेगारांनाही भर रस्त्यात फाशी द्या
मुलींच्या आयुष्याशी खेळ त्यांची किंमत
त्या नराधमांनाही मोजु दया ।। धृ ।।
Priyanka सारखी  परिस्थिती मुलींवर
पुन्हा येवू द्यायची नसेल तर तिच्या गुन्हेगारांना
कठोरातली कठोर शिक्षा द्या ।। १ ।।
मुलगी म्हणजे काम शोभेची वस्तु नाही
कि Use करा आणि फेकुन द्या
अशी कृत्ये करणाऱ्यांना
कायद्याच्या धाक आता कळूच द्या  ।। २ ।।
पुन्हा कोणाची हिमंत नाही झाली पाहिजे
मुलींकडे वाईट नजरेने बघण्याची
भीती नराधमांना कळू द्या ।। ३ ।।
आणखी Priyanka च्या घटना
जर ऐकायच्या नसतील तर
मुलींना समाजात निर्भय पणे वावरु द्या.

**कु.रोहिणी नयन वाघमारे**
बी.ए.भाग -२

## आजची शिक्षण व्यवस्था

शिक्षण व्यवस्था नाही
हा तर  एक व्यापार आहे.
शिक्षणासाठी शेण माती झेलणाऱ्या क्रांती ज्योतीचा
हा घोर अपमान आहे.
विद्यार्थी  आपले कर्तव्य,
आपली शिस्त  विसरतात
शिक्षक लेक्चर  द्यायचं सोडून
ऑफीस मध्ये धीरत बसतात
काय म्हणावं आजच्या पिढीला ?
व उद्याच्या सुजाणांना
क्लास रुम पेक्षा हे
गार्डन  मध्येच जास्त दिसतात.



आदर्शांची संकल्पना काय असावी
हा मला प्रश्न पडतो
लायकी नसतांनाही
त्यांना आदर्शाचा पुरस्कार त्यानांच मिळतो
काय विचार केला असेल
सावित्र ज्योती, आंबेडकरांनी
आपल्यासाठी शिक्षणाच्या
सोयी उपलब्ध करतांनी



खरच आपण त्यांच्या
विचारांना न्याय देतोय ?
आपल्याला दिलेली कर्तव्य
आपण निष्ठेने पूर्ण करतोय ?

' एक बंडखोर पण सत्य विचार '

**कु.रोहीणी नयन वाघमारे**
बी.ए.भाग -१

## माझी मातृ भाषा

मराठी भाषा, महाराष्ट्र संस्कृती आणि मराठमोळं वातावरण हे सारं महाराष्ट्राची शान आहेत. महाराष्ट्राचा इतिहास जगभरात सदैव प्रेरणादायी असाच आहे, इथली विविध पूर्ण साहित्य परंपरा कौतुकास्पद आहे.

अशा या महाराष्ट्रात काही स्वत:त्या उगाचच प्रगल्भ समजणारे लोक गौरवास्पद अशा मराठी भाषेला कमी देखण्याचा प्रयत्न करित आहेत.जणू काही या भाषेतत शिक्षण घेतले तर त्यांची अधोगतीच होईल. हा असा अपप्रचार करुन ते इथल्या मातीतल्या साहित्य संस्कृतीपासून आपल्या मुलांना वंचित ठेवीत आहेत, हे त्यांच्या ध्यानात का येत नाही ? इतर भाषा जरूर शिकाव्यात,कारणं कोणतीही भाषा हे संवादाचे साधन आहे. पण त्या आधी आपली मातृभाषा पक्की असली पाहिजे. तरच आपला आत्मविश्वास बळकट होतो.

कोणत्याही माध्यमात शिकणाऱ्या मराठी मुलांना जर आपली मातृभाषा संपूर्णपणे जाणून घ्यायची, अनुभवाची असेल, शिकायची असेल तर, मराठीतील वैविध्यपूर्ण साहित्य कृतींचे वाचन करावयास हवे.

माझी भाषा,माझी बोली आनंद वाचा, मराठी ओळी.

## बेटी बचाओ बेटी पढाओ !

नको करु तू माझ्या लग्नाची घाई !
शिकून स्वमिमानाने जगू दे गं आई
स्वयंपाक ,भांडे धुने मी करावी घरकाम
करुनी शाळेत जावे सुटली की शाळा
मी येते घरी ठेव भरोसा माझ्या वरी
चुकिचं पाऊल उचलणार नाही.
शिकून स्वाभिमानाने जगू दे गं आई
भया आणि पुरस दिवसभर कुठे ही फिरावे
खेळावे रात्री उशीराने यावे भेद का असा
करता, तुम्ही का समजता मुलीला कमी
मुलांवर भरोसा मुलीवर का नाही
शिकून स्वभिमानाने जगू दे गं आई
शाळा शिकून मी सवित्री ग होईल
गीत महीलात गाईल झेर घेवू दे
अडवू नको खुल्या  भावनेत दाबवू नको
मी यशस्वी होवून हरणार नाही गं
शिकून स्वाभिमानाने जगू दे गं आई
नको करु तू माझ्या लग्नाची घाई
शिकून स्वभिमानाने जगू दे गं आई

कु.मोनाली विनोद भेराने
बी.ए.भाग -१

## खरी सरस्वती (सावित्री)

विद्येचे दैवत अन् तिच गुरुमाय,
देवी पेक्षा विद्येचे धरा तुम्ही पाय
खरी सरस्वती त माई  सावित्रीच हाय
विद्येच मोरठं भांगात तिनं भरलं
ज्योतिबाच गुरु काय मनी डोरलं
शिक्षणाचा वसा घेतला तिनं हाती
पोरीनं शिकाव म्हणून झटे दिनराती
काटयातून  रस्ता कसा काळला पाय
दिवसभर काम करुन रात्री शाळेत नांव हाय
त्यावेळी शिकनं तोंडाची गोट तोती
जमान्याच्या आडव्यां  येत जातीपाती
समाजानं तिचे, लयच केले येले
शेन माती आंगावर टाकल्या नाई  लोक भेले
तरी तिनं हार मानलीच नाय
लोकांच्या शिव्या गोटे फुलासारखे खाय
खरी सरस्वती त माई सावित्रीच हाय
जोतिबाचा हात जरी डोक्शावर होता
बाईचा प्रवास सुखाचा नोता
पहिली मास्तरीन सावित्रीबाई झाली
तिच्या शिवाय बाई ले विद्या नसती आली
त्यावेळेस तिनं सोसलं काय काय
तिच्यामुळे आज तुम्ही जगता व माय
खरी सरस्वी माई सावित्रीच  हाय

कु.दामिनी मुळे
बी.ए.भाग -१

## स्त्री शिवाय माणूस अपूर्णच !

बघा ना
शिक्षण घेत असतांना ' विद्या '
नोकरी उद्योग करतांना ' लक्ष्मी '
अंतसमयी ' शांती '
सकाळ सुरु होते तेव्हा ' उषा '
दिवस संपतांना ' संध्या '
झोपी जातांना ' निशा '
झोप लागली तर ' सपना '
मंत्रोच्चार करतांना ' गायत्री '
ग्रंथ वाचन करतांना ' गीता '
मंदिरात ' दर्शना ',' वंदना ',' पुजा '
' आरती ',अर्चना
शिवाय श्रध्दा तर हवीच !
वृध्दपणी ' करुणा'
पण ' ममता ' सह बरं
आणि राग आलाच तर ' क्षमा ' !
जीवण उजळविण्यासाठी ' उज्वला',
आनंद मिळविण्यासाठी ' कविता '
आणि
कविता करण्यासाठी ' प्रतिभा '
खरंच, आवडलं ना !.

कु. मेघा घाडगे
बी.ए.भाग -१

## भुकेची आग



कोणीतरी वाढनं मले
एकच मनी ध्यास होतं ।
त्यादिवशी पोटात माया
मुक्कामी उपास होता ।
लोक बसले पंगतीमध्ये
मधुर श्लोक आले कानी
मायी मात्र दिनवाणी
त्यायच्या पुढे बकवास होता
अन्नधान्य संपल तरी
घास नव्हता पोटात माया ।
भुकेल्याच्या लाचारीले
तृप्तीसाठी वास होता ।
पाय वळले स्वताकडे
कुत्रे होते संगतील
त्यातही मायावर
गुरगावणारा बॉस होता
माणसानं मारलं होतं
कुत्रे घेणार घेते चावा
द्रारिद्रयाच्या अंधाराचा
जीवनी असा वनवास होता ।

कु. आकांक्षा इंगळे
बी.ए.भाग -१

# युवकांचे आदर्श छत्रपती शिवाजी

खरं तर आजच्या युवकांचे आदर्श हे कोणतेही महापुरुष नसून त्यांचे आदर्श सलमानखान,शाहरुखखान, अल्लु अर्जून, या सारखे हिरो आहेत त्यांच्या सारखं जगण्याचा प्रयत्न आजचे युवक करतात. पण आजच्या युवकांचे प्रेरणास्थान आदर्श हे जर शिवाजी महाराज असले तर त्यांच्यात एक वेगळी उर्जा निर्माण होईल, जगण्याचा अर्थ कळेल, मरणाला सुध्दा घाबरणार नाही इतकी ताकद शिवरायात आहे.उगीचं प्रबोधनकार ठाकरेंनी आपल्या ' देवळाची धर्मे आणि देवळे ' या पुस्तकात लिहलं नाही की जय शिवराय या नावात इतकी ताकत आहे की नुसत जय शिवराय जरी म्हणलं तर ३३ कोटी देवाची फलटन ,त्यांच्या नावापुढे बाद होते. इतकी ताकत त्याच्या नावात आहे आणि ज्यांनी – ज्यांनी शिवरायाचा आदर्श घेतल्या, ते यशाच्या सर्वोच्च शिखरावर जावुन पोहचले, शिवरायाचा आदर्श घेतलेल्या वीर भगतसिंगांनी वयाच्या २३ साव्या वर्षी या देशासाठी फासावर चढले फासावर चढत असतांना भगतसिंगाच्या तोंडून शब्द बाहेर पडला ते म्हणजे शिवाजी महाराज की जय.

कार्मवीर भाऊराव पाटलांनी शिवाजी महाराजांच्या आदर्श घेतला आणि त्यांनी पहिली शिक्षण संस्था स्थापन केली आणि त्या शिक्षण संस्थेला नांव दिलं छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संस्था, महात्मा फुले ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा शिवाजी महाराजांचा आदर्श घेतला आणि देश-विदेशातील लोकांचे शिवाजी महाराजां बद्दल चे उद्गार आपण पाहू या.

१) जर शिवाजी महाराज हे इंग्लंडमध्ये जन्माला आले असते तर आम्ही पृथ्वी ही काय परग्रहावरही राज्य केले असते.

– लॉर्ड माऊंट बॅटन, इग्लंड

२) भारताला जर स्वतंत्र्य मिळवून द्यायचं असेल तर एकच पर्याय आहे,शिवाजी महाराजां प्रमाणे लढा !

– नेताजी सुभाषचंद्र बोस

३) तुमच्या देशाला स्वतंत्र्यासाठी कुठल्या हिटलर ची गरज नाही. तर तुमच्याच देशात जन्माला आलेल्या शिवाजी महाराजांच्या इतिहास ची गरज आहे.

– अॅडाल्फ हिटलर

४) '' शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही तर आजच्या तरूण पिढीसाठी ऊर्जा आहे, जिचा वापर हिंदुस्थानला स्वतंत्र्य मिळवून देण्यासाठी होवू शकतो

– स्वामी विवेकानंद

५) जर,शिवाजी महाराज अजुन १० वर्ष जगले असते तर इंग्रजांना पूर्ण हिंदुस्थानाचा चेहरा सुध्दा पाहतो आला नसता.

– इंग्रज गव्हर्नर

६) काबुल पासून कंदहार पर्यंत माझ्या तैमुर खानदानाने सत्ता निर्माण केली. इराक,इराण, तुर्कस्थानच्या कित्येक नामांकित सरदारांना माझ्या तैमुंर खानदानाने पाणी

पाजलं पण हिंदुस्थान मात्र शिवाजी महाराजांनी आम्हाला रोखला. मी माझी सर्व शक्ती शिवाजी महाराजांना पराभुत करण्यात खर्च केली. पण शिवाजी राजा आमच्या हाती नाही.

आले ! या अल्हााह दुश्मन भी दिया तो कोण दिया शिवा भोसला या अल्लाह अपने जन्नत के दरवाजे खुले रखना क्युकी दुनिया सबसे बहादुर योध्दा और दिलदार दुश्मन तेरे पास आ रहा है। मृत्यूनंतर नमाज पडतांना औरंगजेबने (शिवाजी महाराजांच्या ) पडतांना काढलेले उद्गार संदर्भ खाफीखानाची बखर)

८) उस सिवा ने सिर्फ मेरी उंगलिया नही काटी बल्की मेरे ताकद के घमंड को भी उतारा ये अब निंद में भी सिबा भोसला से नही मिलना चाहता !

तेव्हा या वृत्तपत्राने पहिल्या पानावर जी बातमी छापली होती आणि त्यात शिवाजी महाराजाचा उल्लेख Shivaji the King असा केला.

ज्या शाहीस्ते खानाची बोटे महाराजांनी लाल महालात छाटली आणि त्याच्या मनात । शिवाजी महाराजांचा खौफ निर्माण केला.

तो शाहीस्तेखान साधा सुधा नव्हता तर तो आणि तालिबानचा नवाब होता, तुर्कस्तानचा नबाब होता. प्रति औरंगजेब म्हणून ओळखणार शाहीस्तेखान औरंगजेबच्या सख्या मामा होता त्याने प्रचंड मोठा पराक्रम करुन पोहायांना मोठा बंगला प्रांत जिंकुन दिला होता.

पण एका रात्रीत लाल महालात घुसुन महाराजांनी त्याची बोटे छाटली, आणि काही काळाख्यात पसार झाले. परिणाशी शाहीस्ते खानाने शिवाजी महाराज या नावाची खुप भिती निर्माण झाली होती .


अशा पराक्रमी शिवारायांचे आदर्श आपल्या समोर असायला हवेत.

राहुल सावंत
बी.ए.भाग–२

**********

## शेतकऱ्याची व्यथा

म्हणतात शेतकरी जगाचा पोशिंदा
त्याच्या सहकार्यामुळेच मिळतो,
आपल्याला  खांदा
पण आपल्या देशातील शेतकऱ्याचे
खुप खराब आहेत हाल
रस्त्यात व्याच्या आहे नवनवीन
सतुटाचे जाल.
पडत नाही भारतात पाणी अन्
पाऊस बिना पाण्याचा सांगा तो
कसा पिकवेल ऊस
पाणी लागते पिकायला वांगी
सागा याची ही व्यथा जो,
कोणाला सांगी



शेतीसाठी बिचारा काढतो कर्ज
पण बँक देत नाही कर्ज,
कितीही करुन अर्ज एवढेच नव्हे.
तर सावकार असतो नेहमी पैसे,
मागायला सुसज्ज
नवनवीन योजना सरकार काढतात.
शेतकऱ्यासाठी पण त्याचा काहीच,
फायदा होत नाही.
अशा परिस्थितीत काय,
करी गरीब शेतकरी
बांधुन छातीला  व्याज्याच्या
कापसाचि दोरी
शेतकरी बिचारा आत्महत्या करी.



## आयुष्य

आयुष्य सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही,
एकमेकास दिसत नाही.
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष संवाद
नित्य चाले वाद–विवाद
धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
ह्रदयाचे पाऊस कधी
ह्रदयाकडे वळत नाही.
इतक जगून झाले पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
कहीच कसला मेळ नाही.
क्षण एक येईल असा,
घेडन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे.
थोड तरी जाणुन घ्या.
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघुन घ्या.

**कु.दिव्या गणेश राऊत**
बी.ए.भाग–२

# शिक्षक म्हणजे कोण ?

आपल्याला जन्म देणारी आई
लहानाचे मोठे करणारे बाबा
आणि शिक्षण देणारे ते म्हणजे शिक्षक।।१।।

भविष्य पाहण्यासाठी मदत करतात झाड
ते भविष्य उज्वल करणारे  म्हणजे शिक्षक
भविष्यात आपली शिक्षणाने ओळख होईल.
ते शिक्षण देणारे म्हणजे शिक्षक  ।। २ ।।

आपल्याला चिखलातून कमळ
बनविणारे, आपल्याला ज्ञान देवुन
पारिजातकासारखे आपल्या
ज्ञानाचा सुगंध चोहिकडे प्रसविणारे
दिव्य पुरन म्हणजे शिक्षक ।। ३ ।।

जसे झाडे लावले की पाऊस येतोच
तसेच शिक्षणामुळे यश मिळतेच
यश मिळणे याचे कारण म्हणजे शिक्षक।।४ ।।

कोण म्हणते देव नसतात
मी तर दोन देवांना बघितलं
पहिले माझे आई-वडिल
दुसरे म्हणजे माझे शिक्षक.....



**आई**

एकमेव स्त्री जी माझा चेहरा
बघायच्या आधीपासून माझ्यावर
प्रेम करते.......

**बाबा**

एकमेव माणुस जो माझ्यावर
स्वत: पेक्षाही जास्त
प्रेम करतो.......

'' मास्तर '' या शब्दावर खुप जोक ऐकले....
पण आज याचा अर्थ समजुन घेऊ या......
'' मा '' म्हणजे आई
'' स्तर '' म्हणजे पातळी, दर्जा
'' मास्तर '' म्हणजे आईच्या पातळीवर
जाऊन जीव लावणारा जीवनाचा स्तर
उंचवणारा व्यक्ती.

**कु.कोमल अंभोरे**
**बी.ए. भाग -१**

# आई



कोणत्या शब्दांत सांगु आई
तू माझ्यासाठी काय आहेस...... ?
भुकेल्या जिवाचा मायेचा घास तू
वेदनेनंतरची माझी पहिली हाक तू
अन् माझा प्रगाढ विश्वास तू
हृदयाच्या स्पंदनातील माझा प्रत्येक श्वास तू
जीवनातील माझ्या सुखाची बाग तू
आगीमधी रागात सूर्याची आग तू
अंधारालाही दूर करणारा प्रकाश तू
माझी मायेची धरती अन् छायेचं
आकाश तू......
मायेच्या पावसाचा ओलावा तू
जीवनी सुखाचा गारवा तू
आई, दुधरुपी अमृताचा गोडवा तू
अन् शेवटच्या क्षणापर्यंतचा कुशीतील
विसावा तू.....

**कु.दिपाली शिवहरी घाटोळकर**
**बी.ए. भाग -१**

# शेतकऱ्यांचे हाल

विराट सतरा करोडात गेला
धोनी पंधरा करोडात गेला
जगाचा पोशिंदा मात्र
झाडावर लाटकुन मेला
भारत कृषीप्रधान की क्रिकेटप्रधान
हाच मोठा प्रश्न पडतो
शेतकरी जगला काय मेला काय
सांगा कुणाला फरक पडतो
अरे एखादी मॅच तुम्ही
वावरात घेऊन पहा
शेतकऱ्यांची जिंदगी
एकतरी दिवस जगुन पहा
खेळाडुंसारखे करोड नको
फक्त पिकमालाला भाव द्या
कृषीरत्न कृषीभुषण नको
फक्त शेतकऱ्याला मान द्या
लाखमोलाचं वाक्य
ज्या दिवशी आपला जन्म
झाला तोच दिवस
तीच वेळ आपल्यासाठी शुभता
जन्माला येतांना कधी मुहुर्त
पाहिला नाही व मरतांना ही पाहणार नाहीत.
तरी सुध्दा जिंदगी मुहुर्त
पाहण्यात जाते.
आपल्यासाठी सगळेच दिवस
सर्वच वेळ शुभ आहे.
फक्त इच्छाशक्ती प्रबळ असावी....
आणि मन स्वच्छ असावं
नातं रक्ताच असो किंवा मानलेल....
मदतीच्या वेळी जे आधार

**कु.दिपाली डिगांबर नाकट**
**बी.ए. भाग -२**

# माता पिता आणि जीवन



''आईचे प्रेम सर्व प्रेमाची गंगोत्री आहे, आई तुझी माया, जसा पारीजातकाचा सडा, ओढयासठी कंटकात फुले सुगंधी केवडा ! ।।मित्रांनो आई विषयी सांगायचे झाले तर...आईला आपण आपला आद्य गुरु मानले आहे तिने तिच्या परीने आपल्याला तिच्या विचारांची आचारांची शिदोरी दिली आहे. जी कधी सरतही नाही आणि कधी उरतही नाही... तसेच आपल्या बाबाविषयी सांगायचे झाले तर, वडील आपल्याला लहानपणापासुन अंगा खांद्यावर खेळवतात. जगासोबत आपल्यासाठी संपत्ती गोळा करतात. आणि एक दिवस त्या संपत्तीचा तुम्हाला वारस बनवतात. परंतु आपण ज्या आई-वडीलांनी आपल्यासाठी एवढे कष्ट घेतले. त्यांनाचा एक दिवस नवीन पिढीतील आपण सर्व कालच्या विचारांचे आहेत असे म्हणुन दूर लोटतो. पण त्यांचे विचार जरी जुने असले तरी तेच विचार अनुभवाने परीपक्व झालेले असतात. हे कधीच विसरता कामा नये. त्यांनी हया जगाचे सर्व अनुभव पाठीशी बांधलेले असतात. ज्या कल्पना आपल्याला तुच्छ वाटत असतात. तो कालच्या आणि आजच्या पिढीचे जीवन घडवित असतात. माँ घर का सौभाग्य, तो पिता घर का अस्तित्व होते है । माँ केपास अश्रुधारा है, तो पिता के पास संयम होता है । दो समय भोजनसा बनाती है , तो जीवनभर के भोजन की व्यवस्था पिता करते है ।

इसलिए, हमारे माता -पिता से ही हमारा जिवन सुखी बनती है । तुम्हा सर्वांना माहिती आहे का की आपले जीवन घडविणे आणि बिघडवणे है सर्वस्वी आपल्या हातात आहे. तुम्ही आम्हा चुकीच्या मार्गावर जात असू तर आपले आई-वडीलच आपल्याला सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. आपण तात्पुरत्या मोहाला, स्वार्थीला बळी पडून आपले जीवन उध्दवस्त करत असतो हे आपल्याला कळतच नाही.

स्वामी विवेकानंदाचे विचार छ.शिवाजी महाराजांचे वागणे,बाबासाहेबांची विद्वत्ता हे जीवन आदर्शवंत घडविण्याची खऱ्या अर्थाने चाबी आहे. पण आपण हताश,निराश झाल्या सारखे संघर्ष न करता. पराभव मान्य करतो.पण आपल्या आई-वडीलांना आपल्या जीवनांची नाव सतत प्रवाही रहावी असे वाटते. म्हणून की एकदा ते आपल्या सोबत कठोर सुध्दा वागतात. हे त्यांचे बोलणे हे कारणारुप योग्य असते हे आपल्याला कदाचित त्यांच्या वयास गेल्यावरच कळेल म्हणून म्हणते त्यांच्या आज्ञेत आपले भलचं असतं म्हणुन आपण त्यांची नाळ आपल्याला सोबत कधी तुटू देवु नका ऐवढचं मी शेवटी ऐवढचं म्हणू !

आपण काही चांगले केल्यावर माझ्या लेकराला काही कमी पडू नये म्हणून जे घाम गाळतात. आयुष्याच्या वाटेवर चालणास आपल्या लेकरांच्या सुखासाठी. जे आपला देह अर्पण करतात.. दुसरे कुणी नाही हो आपले आई-वडीलाचं असतात. आपले आई -वडीलचं असतात.

**कु. प्रगती सोनोने**
**बी.ए.भाग - २**

## तुमच्यासाठी

आई तुझे थोरपण कुणी गं सांगावे
पण, बाबा तुझ्या मोठेपणाला
शब्द कमी पडावे,
नऊ महिने गर्भात बाळाला ठेवणारी
आई तर
त्याच्या काळजी साठी रक्त ओकणारा
बापही मी पाहिला आहे.
आईचे रडणे कोणालाही दिसते.
पण बापाच्या मनातील हुंदके कुणी ऐकले आहे.
सर्वकाही करणारी आई तू गं आहेस
पण,सर्वस्व करणारा माझा बापही मोठा आहे
धरणी सारखी जपणारी आई तू मला वाटते.
पण, अभाळासारख्या बापाच्या
छायेची ही गरज मला भासते,
कुणी वेगवेगळी सांगावी,
आई–बाबा तुमची किर्ती
खरंतर एक आहे की,
एकच आहे तुमची मूर्ती
म्हणून ,आई तुझे थोरपण कुणी गं सांगावे
पण,बाबा तुमच्या मोठेपणाला
शब्द कमी पडावे.

## ⁕ मुलींनी जगावे तरी कसे ?

⁕ मुलींनी जगावे तरी कसे ?
मनमोळकेपणाने समाजात वावरलं
तर,म्हणतात पोरीला घरबंधन नाही !
शांत,धीर व गंभीरपणे वावरली
तर म्हणतात,सामना करण्याची हिमंत नाही.
लवकर लग्न केलं, तर म्हणतात
एखादं लफडं लपवायचं असेल
लग्नाला उशीर होत असेल तर
म्हणतात ,मुलींत एखादी खोट असेल
शिक्षण कमी घेतले तर म्हणतात
मागासलेल्या विचारांची असेल
खुप शिकलेली असेल तर म्हणतात
काय कामाची डोक्यावर मिरे वाटेल ?
मित्रमंडळी ,मैत्रिणी जास्त असतील
तर म्हणतात, उनाड असेल,
मुलींनी या दुतोंड्या जगात जगावे तरी कसे ?
निरपराधी असतांना खोट्या बदनामीत
जगावे तरी कसे ?

**कु.पुजा रामेश्वर काकड**
**बी.ए.भाग - २**

# आई-वडील

‘आई -वडील ’ म्हणजे नक्की काय असतं ?
आयुष्य जगण्यासाठी देवाने दिलेलं
ॲडव्हान्स पाठबळ असतं......
तुमच्या प्रत्येक दिवसात ,त्यांनी आपलं स्वप्न
पाहिलेलं असंत, तुमच्या जन्मापासून त्यांच्या
मरण्यापर्यंत त्यांनी आपलं आयुष्य खर्चलेलं असतं
‘ आई ’ तुमच्या
आयुष्याच्या गाडीचं योग्य
दिशा देणार ‘‘ स्टीयरिंग ’ असतं...
तर अचानक आलेल्या संकटात सावरायला
‘‘ वडील ’’
म्हणजे ‘‘ अर्जंट ब्रेक ’’ चा पर्याय असतं....
‘ आईचं प्रेम ’ हे रोजच्या आयुष्यात कामाला
येणार ‘‘ बँक बॅलन्स ’’ असतं.
तर ‘ वडील ’ म्हणजे गरजेच्या वेळी मिळणारा
तुमच बोनस किंवा ‘‘ व्हरीटाबल पेमेंट असतं...
‘ आई ’ म्हणजे तुमच्या सतत जोडणार,
मोबाईलचं ‘‘ नेटवर्क ’’ असतं.......
आणि कधी ‘‘ नेटवर्क ’’ थकले.
तर ‘ वडिल ’ अर्जट एम.एम.एस. असतं.....
‘‘ आई ’’ म्हणजे तुमच्या
आयुष्यातलं ‘‘ ॲंटीव्हायरस ’’ असतं
तर शोधून काढलेले व्हायरस संपवायचं
‘ वडिल ’ हे क्वारनटाईन ’’ बटन असतं.....
‘‘ आई ’’ म्हणजे तुमच्या
आयुष्यातलं ‘‘ शिक्षणाचं विद्यापीठ असतं....
तर ‘ वडिल ’ म्हणजे चालती बोलती
अनुभवाची फॅक्टरी असते.....



‘आई ’ म्हणजे तुमच्या आयुष्यातली
साठवलेली पुण्याई असते....
तर ‘ वडिल ’ म्हणजे कंबर
कसून आयुष्यभर
मिळालेली कमाई असते....
‘ आई ’ म्हणजे तुमच्या आयुष्यातला
‘ मार्गदर्शक गुरु’ असतो.....
आणि भले मोठे संकट आले की
उच्चारात ‘‘ बाप रे बाप ’’
असतं....
आई-वडील म्हणजे नकळत मागे
असलेली मायेची सावली असते....
उगाच नाही आपल्या संस्कृतीत
‘‘ मातृ देवो भव ’’अन् ’’ पितृ
देवो भव ’’
असे म्हणलेलं आहे.....
खरंच आई-वडिलाच्या सेवेसाठी कधीही
नाही
म्हणू नका कारण जग हे पाहतोय ते आई
वडिलामुळे
आई-वडील हीच खरी दौलत
एकदा फुललेली फुल
पुन्हा फुलत नाही.

**कु. पोर्णिमा सत्यविजय हागे**
**बी.ए.भाग - २**

## शेतकरी बाप

रात दिस मेहनत करी
खाई कष्टाची भाकरी
पोचतो ही दुनिया सारी
बाप माझा शेतकरी ।। १ ।।
त्याला साऱ्या दुनियाचा घोर
म्हणून खाई अर्धीच भाकर
जगा देतो तो पोटभर
ना त्याला सुख तिळभर
त्याच्याच कष्टाच खाती सारी
बाप माझा शेतकरी ।। २ ।।
त्याच्या मुळेच सार जग
ना दिसती त्याच कुणा दुःख
त्याचच खाऊन, सर्वा सुख
त्याच्याच नशीबी आलय दुःख
रात दिस ढेकलान मरी
बाप माझा शेतकरी ।। ३ ।।
काळा मातीची त्याची खाणं
राबी त्याच्यात विसरुन भान
घेऊन वाड वडीलाची आण
काढी त्यातून हिरव सोन
नसे त्यांना किमंत जरी
बाप माझा शेतकरी ।। ४ ।।

## शिवाजी पोवाडा

शिवाचा गरजा जयनामाचा झेंडा रोविला
क्षेत्राचा मेळा मावळ्याचा शिकार खेळला
माते पायी ठेवी डोळे गर्व नाही काडीचा
आशीर्वाद घेई आईचा
आलबदला होई आवडता होई आईचा
पवाडा गातो शिवाजीचा
कुळवाडी –भुषण पवाडा गातो भोसल्याचा
छत्रपती शिवाजीचा

## जय शिवराय

महाराजांचा जन्म झाला तो
किल्ला शिवनेरी
महाराजांचा मृत्यू जेथे झाला
तो किल्ला रायगड
किती अजब संगम आहे
दोन्ही नावाची पहिली दोन
अक्षरे घेतली तर एक महान
नाव तयार होते ते म्हणजे '' शिवराय ''

## '' आई ''

आयुष्यातला पहिला गुरु आई....
आयुष्यातली पहिली मैत्रीण आई....
आयुष्यातलं पहीलं प्रेम आई....
आयुष्यातला पहीलं शब्द आई....
आणि सगंळ आयुष्य म्हणजे आई......

**कु. पोर्णिमा सत्यविजय हागे**
**बी.ए.भाग - २**

# आई



आई तुझ्याच का ग माथी लिहिलेलं  दु:ख असतं
लेकराच्या भविष्यासाठी ,कामाच्या ओझ्याखाली मरावं लागतं
मुलांच्या पोटासाठी वणवंण पळावं लागतं
तुझ्याच का गं माथी, लिहिलेलं दु:ख असतं ।। धृ ।।

परिवाराच्या वेदनांना घेवुन जळावं लागतं
कटकटीची ढाल घेऊन फिरावं लागतं
इतराच्या इच्छेपरी जगावं लागतं
आई तुझ्याच का ग माथी लिहिलेलं दु:ख असतं ।।१।।

अंगावर साडीचा पदर नको असतं
फाटक्याच लुगडयाचा गाठी पाडत असतं
कायेला तुझ्या तलवारी परी लढावं लागतं
आई,तुझ्याच का ग माथी लिहिलंलं दु:ख  असतं ।। २ ।।

सुखाचा मोती मिळवायला दु:खाच्या सागरात बुडावं लागतं
कष्टाच्या खाच खळग्यातुन वाहत सुटावं लागतं
पाहता दैना तुझी अंगावर शहीरे उठतं
आई, तुझ्याच का ग माथी लिहिलेलं दु:ख असतं
आई तुझ्याच का ग माथी लिहिलेलं दु:ख असतं



कु. हर्षा दादाराव सदांशिव
बी.ए.भाग - १

## मातृभूमिची शान शिवाजी

मातृभूमीची शान शिवाजी
स्वातंत्र्याचा प्राण शिवाजी,
शत्रुला जो चिरुन गेला
धारदार तो बाण शिवाजी ।। धृ ।।
सारेच धर्म त्यास सारखे
माणुसकीचे भान शिवाजी,
वैराग्याची आस अंतरी
संतांचा सन्मान शिवाजी ।। १ ।।

परक्या स्त्रीला माता म्हटले
चारित्र्याची खाण शिवाजी,
कडे कपारी डोंगरखिडी
सहयाद्रीचा मान शिवाजी ।। २ ।।

शौर्य साहसी धैर्य धाडसी
युध्दातले तुफान शिवाजी
पिचलेल्यांना दिली प्रेरणा
संघर्षाचे रान शिवाजी ।। ३ ।।

काळासोबत जरी चालले
काळापुढची जाण शिवाजी
युगायुगांना कवेत घेते
चिरंतनाचे दान शिवाजी ।। ४ ।।



## ' सगून '

तू घासत बसली भगून
लोकं चंद्रावर गेले निघून ।। धृ ।।
नवस केले अन् दिवस गेले
असं कधी झालं तू सांग ना मले
तू कोन्या भ्रमात राहली जगून
लोकं चंद्रावर गेले निघून ।। १ ।।
सपत्यात पोथ्या लावल्या मोठया
पोथीतल्या अर्ध्या गोष्टी खोटया
तू आयकत बसली रंगून
लोक चंद्रावर गेले निघून ।। २ ।।
अंगात आली अन् संगात केली
रातभर सवारी घुमत गेली
तुले काय भेटलं देवाला मागून
लोकं चंद्रावर गेले निघून ।। ३ ।।
डोकश्यात भुताचे भरले वारे
भारुन घेतले लिंबू दोरे
तू अशी काय राहुली वागून
लोकं चंद्रावर गेले निघून ।। ४ ।।
मनाचे भरम जाऊ दे सारे
अन् विज्ञानाचे वाहू दे वारे
उघडया डोळ्यांनी घे जग बघून
लोकं चद्रांवर गेले निघून ।। ५ ।।

शारदा नामदेव आसरे
बी.ए.भाग – २

# स्त्रीजन्म म्हणोनी न व्हावे उदास !

आपणाकडे मुलीचा जन्म झाला म्हणजे घरात सर्वत्र उदास वातावरण पसरत असे, स्त्री म्हणजे एक प्रकारचे ओझे कुटुंबास वाटे मुलगी किंवा कन्या हे दुसऱ्याचे धन आहे असे मानले जाई म्हणून पुरुषापेक्षा स्त्रीला मानही कमी असे.

त्यातून ही स्त्री खालच्या जातीची असेल, तर तिच्या जीवनाची सर्वत्र तिची अवहेलना होत असे. या सर्वसाधारण समजुतीस धक्का दिला तो सतांनी संत पंरपरेत महदाइसा मुक्ताबाई जनाबाई बहीणाबाई वेणाबाई इत्यादी स्त्रियांनी परमार्थिक क्षेत्रात फार मोठे स्थान मिळविले आहे. जनाबाई ही तर नामदेवांच्या घरची दासी आधीच नामदेव शिंपी म्हणुन पंढरपूरच्या समाजव्यवस्थेत त्यांना स्थान नव्हते आणि त्यांच्या घरी झाडलोट करणारी जनाबाई ही एक शूद्राची मुलगी पण तिने आपल्या भक्ती बळावर फार मोठे स्थान प्राप्त केले होते. आपला जन्म कोठे झाला ? आपली जात कोणती ? आपण स्त्री जातीत जन्मास आलो, याबद्दल तिला चिंता नव्हती. एका अभंगात म्हटले जाते की, स्त्रीजन्म म्हणुनी न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी । संताचे घरची दासी मी अंकीली । विठोबाने दिली प्रेमकळा ।। विदुर सात्विक माझी ये कुळीचा कुळीचा अंगीकार केला त्याचा देवे । न विचारिता कष्ट गणिका उध्दरिली । नामे सरती केली तिन्ही लोकी । या अभंगात म्हटले आहे की स्त्रीचा जन्म माझा म्हणुन मी उदास का व्हावे ? साधुसंतानी मला पावन केले आहे . विदुर माझ्याच जातीचा असला तरी त्यचा अंगिकार देवाने केला ना ? याच ईश्वराने गणिकेचा तिची जात व कर्म न पाहता उध्दार केला ना ? अनेक ऋषींची कुळे पाहु नयेत हेच खरे म्हणुन स्त्रीचा जन्म झाला म्हणुन उदास होण्याचे कारण नाही.

कळी बोलते

या प्रसंगे कळी हलते डोलते गुपचुप त्याच्या कानात बोलते तुझ्या बरोबर नेशील का रे दुर खुडतील कोणी माझे फुल, मी असा फिरता कुठे तुला नेऊ घर नाही दार कुठे तुला ठेवु छान छान इथे खुप झुलायच झोका घेता होता हळु फुलायचं । फुलता फुलता होशील सुंदर, सुगंधीत होईल, सारा परिसर.



कु.पायल रामेश्वर राठोड
बी.ए.भाग - २

## आयुष्यातील वळण

आयुष्याचा वळणावर
कसे काही सूचत नाही
दिशा दाखवण्यास मात्र
कोणीच समोर येत नाही ।। धृ ।।
शिक्षक आपले माय बाप
तेच जगणे शिकवितात
जगण्याचा मोठा हेतू
तेच आपल्याला कळवितात,।।१ ।।
आयुष्य जगण्याचा हेतू
तो आपल्याला कळत नसतो,
आई बापाची सेवा करणं
गुरुचं आपल्याला सांगत असतो ।। २ ।।
इतकं जगुण झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसे कळत नाही ।। ३ ।।
अजुनही वेळ आहे
ध्यैर्य आपले जाणून घ्या.
ते पूर्ण करण्याची क्षमता
मनात आमच्या ठाणून घ्या. ।।४।।

## जाती भेद

मी लहान असतांना
आई सांगत होती कथा
आपल्या देशांमध्ये आहे
अनेक खुळचर प्रथा,
जाती भेद केला म्हणून
धर्म सारे बाटले,
जाती भेद करणाऱ्यावर
करा दाखल खटले,
सर्व धर्म समान आहेत
संविधान आपले सांगते,
मग नोकरीच्या कामासाठी
जातीचा दाखला का मांगते.
विचार आपले बदला
तेव्हा जाती भेद दूर होईल,
सुरुवात आपल्या पासून करा
सर्वांच्या हे लक्षात येईल.

**शिवा थाटे**
बी.ए.भाग - १

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

### जाती निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या

### सत्र : २०१९-२०२०

| Class | S.C. | | S.T | | O.B.C | | VJNT | | OPEN | | MF TOTAL | | SBC | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | F | |
| B.A. I | 27 | 06 | 04 | 01 | 36 | 29 | 23 | 12 | 14 | 03 | 104 | 51 | .... | 155 |
| B.A II | 06 | 08 | 00 | 01 | 10 | 22 | 03 | 08 | 02 | 00 | 21 | 40 | 01 | 61 |
| B.A III | 02 | 04 | 01 | 00 | 08 | 16 | 00 | 03 | 00 | 00 | 11 | 23 | .... | 34 |
| Total | 35 | 18 | 05 | 02 | 54 | 07 | 26 | 23 | 17 | 03 | 136 | 114 | 01 | 256 |

### सत्र : २०२०-२०२१

| Class | S.C. | | S.T | | O.B.C | | VJNT | | OPEN | | MF TOTAL | | SBC | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | F | |
| B.A. I | 31 | 18 | 01 | 03 | 19 | 32 | 25 | 19 | 12 | 04 | 70 | 76 | .... | 146 |
| B.A II | 05 | 06 | 01 | 01 | 16 | 26 | 07 | 08 | 01 | 01 | 30 | 42 | 01 | 72 |
| B.A III | 06 | 03 | 00 | 01 | 11 | 19 | 01 | 06 | 01 | 01 | 19 | 30 | .... | 49 |
| Total | 42 | 27 | 02 | 05 | 46 | 84 | 33 | 33 | 14 | 06 | 119 | 14 8 | 01 | 267 |

# पदवीदान समारंभ अहवाल

सत्र : २०१९-२०२०
२०२०-२०२१

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या दि. २६ डिसेंबर २०१८ च्या पत्रान्वये व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या ४/२०१८ परिनियमान्वये पदवी/पदविका प्रमाणपत्र वितरणांचे अधिकार महाविद्यालयांना प्रदान करण्यात आले.उपरिनिर्दिष्ट परिनियमाचा आधार घेऊन विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांनी आपआपल्या महाविद्यालयामध्ये स्वतंत्रपणे पदवीदान समारंभाचे आयोजन करावे असे ठरले होते.

आमचे महाविद्यालय, सुशिक्षण प्रसारक मंडळ ,पिंजर द्वारा संचालित आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी आमचे महाविद्यालय कायम संलग्रित असून आम्हाला भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस कॉलेज पिंजर या नावाने परिक्षेत्रात ओळखले जाते आमच्या महाविद्यालयांना २ फ व १२ ब चा यु.जी.सी. चा दर्जा प्राप्त झाला असुन बंगलोरच्या नॅशनल असेसमेन्ट ॲन्ड ॲक्रिडिटेशन संस्थेन (नॅक) तिसऱ्यांदा मुल्यांकन करुन '' बी '' श्रेणी बहाल केली आहे. वाङ:मय स्नातक (बी.ए.) हा तीन वर्षाचा अभ्यासक्रम आमच्या महाविद्यालयात शिकविला जातो. आवश्यक विषयामध्ये इंग्रजी,मराठी हे विषय असून ऐच्छिक विषयामधून (राजशास्त्र,अर्थशास्त्र, इतिहास ,समाजशास्त्र,मराठी वाङ:मय ) विद्यार्थ्यांना तीन विषयाची निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या (२०१६ ) ४/२०१८ या परिनियमांच्या अधीन राहून आमच्या महाविद्यालयाने गतवर्षीच्या सत्र २०१८ व उन्हाळी २०१९ च्या एकुण ३० पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दि.२६ जानेवारी २020 रोजी पदवीदान समारंभाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या पदवीदान समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्हि.सी. खारोडे हे होते तर प्रमुख अतिथी डॉ.ए.के.ठाकरे व डॉ.एम.के.फडणीस सर होते. सत्र २०१९– २020 मधील २५ पदव्यांचे वितरण दि.१९ जुलै २0२1 च्या समारंभात मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. पदवीदान समारंभाच्या अखेरच्या टप्प्यात अध्यक्ष अतिथींनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे दिक्षांत भाषण केले कार्यक्रमाचे सुत्र संचलन डॉ. अशोक वाहुरवाघ यांनी केले तर दिक्षांत सोहळ्याच्या आभार प्रदर्शन इतिहास विभाग प्रमुख प्रा.एस.एम.मनवर यांनी व्यक्त केले.

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर

ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

## वार्षिक नियोजन - २०२०-२१
## कृती आराखडा

| क्र. | दिनांक | वार | विवरण |
|---|---|---|---|
| १ | १०-०६-२०२० | सोमवार | सत्रारंभ व प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ |
| २ | २२-०६-२०२० | शनिवार | संस्थापक अध्यक्ष सु.प्र.मंडळ,पिंजर कै.भाऊसाहेब लहाने यांची जयंती |
| ३ | २६-०६-२०२० | शुक्रवार | छत्रपती शाहु महाराज जयंती |
| ४ | ११-०७-२०२० | शनिवार | वन संवर्धन दिन |
| ५ | २३-०७-२०२० | गुरुवार | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती |
| ६ | ०१-०८-२०२० | शनिवार | लोकमान्य टिळक पुण्यतिथी - अण्णाभाऊ साठे जयंती |
| ७ | १३-०८-२०२० | गुरुवार | पालक मेळावा संयोजक : प्रा.डॉ.वासुदेव भगत |
| ८ | १५-०८-२०२० | शनिवार | स्वातंत्र्य दिन |
| ९ | २६-०८-२०२० | बुधवार | महाविद्यालयामध्ये परिसंवाद आयोजित करणे अभ्यास मंडळाची स्थापना करणे संयोजक : प्रा.डॉ.एम.के.फडणीस |
| १० | ०४-०९-२०२० | शुक्रवार | स्थानिक व्यवस्थापन परिषदेची सभा |
| ११ | ०५-०९-२०२० | शनिवार | शिक्षक दिन /प्रथम घटक चाचणी |
| १२ | ०८-०९-२०२० | मंगळवार | जागतिक साक्षरता दिनक संयोजक : रा.से.यो.पथक |
| १३ | २१-०९-२०२० | सोमवार | मान्यवर वक्त्यांच्या परिसंवादाचे आयोजन संयोजक : प्रा.एस.एम.मनवर |
| १४ | २४-०९-२०२० | गुरुवार | राष्ट्रीय सेवा योजना दिन |
| १५ | २८-०९-२०२० | सोमवार | कर्मचारी परिषदेची सभा |
| १६ | ०२-१०-२०२० | शुक्रवार | महात्मा गांधी व लालबहाद्दुर शास्त्री जयंती. |
| १७ | ०५/१०/२०२० | सोमवार | राष्ट्रीय सेवा योजना शिबीर |
| १८ | ११/१०/२०२० | रविवार | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी |

| क्र. | दिनांक | वार | विवरण |
|---|---|---|---|
| १९ | ०१/१२/२०२० | मंगळवार | जागतिक एडस विरोधी दिन |
| २० | ०६/१२/२०२० | रविवार | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन |
| २१ | २०/१२/२०२० | शनिवार | गाडगे बाबा जयंती |
| २२ | २६/१२/२०२० | शनिवार | अर्धे सत्र समाप्ती |
| २३ | ३०/१२/२०२० | बुधवार | स्थानिक व्यवस्थापन परिषदेची सभा |
| २४ | ०३/०१/२०२१ | रविवार | क्रांतीज्योती सावित्री फुले जयंती |
| २५ | ०७/०१/२०२१ | गुरुवार | स्पर्धा परिक्षेचे आयोजन :प्रा.डॉ.ए.के.ठाकरे |
| २६ | ०९/०१/२०२१ | शनिवार | परिसंवाद आयोजन : प्रा.डॉ.अशोक व्ही.वाहुरवाघ |
| २७ | १२/०१/२०२१ | मंगळवार | युवक दिन स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रमाता जिजाबाई जन्मदिवस |
| २८ | २६/०१/२०२१ | मंगळवार | प्रजासत्ताक दिन |
| २९ | ०५/०२/२०२१ | शुक्रवार | परिसंवाद आयोजन :प्रा.आर.एन.गावंडे |
| ३० | १९/०२/२०२१ | शुक्रवार | श्री शिवाजी महाराज जयंती |
| ३१ | २३/०२/२०२१ | मंगळवार | संत गाडगेबाबा जयंती |
| ३२ | २८/०२/२०२१ | रविवार | जागतिक विज्ञान दिन |
| ३३ | ११/०३/२०२१ | गुरुवार | कै. भाऊसाहेब लहाने यांची पुण्यतिथी व राजे संभाजी महाराज यांचा बलीदान दिवस |
| ३४ | १४/०४/२०२१ | बुधवार | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| ३५ | २२/०४/२०२१ | गुरुवार | वसुंधरा दिन |
| ३६ | २५/०४/२०२१ | बुधवार | सत्र अखेरची सभा (शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी) |
| ३७ | ०१/०५/२०२१ | शनिवार | महाराष्ट्र दिन ध्वजारोहण व कामगार दिन समारंभ |

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर

ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

वार्षिक नियोजन - २०२१-२२

कृती आराखडा

| क्र. | दिनांक | वार | विवरण |
|---|---|---|---|
| १ | ३०-०८-२०२१ | सोमवार | सत्र आरंभ व प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ |
| २ | ०४-०९-२०२१ | शनिवार | स्थानिक व्यवस्थापन परिषदेची सभा |
| ३ | ०५-०९-२०२१ | रविवार | शिक्षक दिन |
| ४ | ०८-०९-२०२१ | बुधवार | जागतिक साक्षरता दिवस संयोजक : रा.से.यो.पथक |
| ५ | २१-०९-२०२१ | मंगळवार | मान्यवर वक्त्यांच्या परिसंवादाचे आयोजन संयोजक : प्रा.डॉ.अशोक व्ही.वाहुरवाघ |
| १४ | २४-०९-२०२१ | शुक्रवार | राष्ट्रीय सेवा योजना दिन |
| १५ | २८-०९-२०२१ | मंगळवार | कर्मचारी परिषदेची सभा |
| १६ | ०२-१०-२०२१ | शनिवार | महात्मा गांधी व लालबहाद्दुर शास्त्री जयंती. |
| १७ | ०५-१०-२०२१ | मंगळवार | राष्ट्रीय सेवा योजना शिबीर |
| १८ | ११/१०/२०२१ | सोमवार | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी |
| १९ | ०१/१२/२०२१ | मंगळवार | जागतिक एडस् दिन |
| २० | ०६/१२/२०२१ | बुधवार | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन |
| २१ | ३०/१२/२०२१ | गुरूवार | स्थानिक व्यवस्थापन परिषदेची सभा |
| २२ | ०३/०१/२०२२ | सोमवार | क्रांतीज्योती सावित्री फुले जयंती |
| २३ | ०७/०१/२०२२ | शुक्रवार | स्पर्धा परिक्षेचे आयोजन :प्रा.डॉ.ए.के.ठाकरे |
| २५ | ०९/०१/२०२२ | रविवार | परिसंवाद आयोजन : प्रा.एस.एम.मनवर |
| २६ | १२/०१/२०२२ | बुधवार | युवक दिन स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रमाता जिजाबाई जन्मदिवस |

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर
ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

वार्षिक नियोजन - २०२१-२२
कृती आराखडा

| क्र. | दिनांक | वार | विवरण |
|---|---|---|---|
| २७ | २६/०१/२०२२ | बुधवार | प्रजासत्ताक दिन |
| २८ | ०५/०२/२०२२ | शनिवार | परिसंवाद आयोजन :प्रा.आर.एन.गावंडे |
| २९ | १९/०२/२०२२ | शनिवार | श्री शिवाजी महाराज जयंती |
| ३० | २३/०२/२०२२ | बुधवार | संत गाडगेबाबा जयंती |
| ३१ | २८/०२/२०२२ | रविवार | जागतिक विज्ञान दिन |
| ३२ | ११/०३/२०२२ | गुरुवार | कै. भाऊसाहेब लहाने यांची पुण्यतिथी व राजे संभाजी महाराज यांचा बलीदान दिवस |
| ३३ | १४/०४/२०२२ | बुधवार | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| ३४ | २२/०४/२०२२ | गुरुवार | वसुंधरा दिन |
| ३५ | २५/०४/२०२२ | बुधवार | सत्र अखेरची सभा (शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी) |
| ३६ | ०१/०५/२०२२ | शनिवार | महाराष्ट्र दिन ध्वजारोहण व कामगार दिन समारंभ |

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज ,पिंजर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे गॅझेट -२०२०

## कृती कार्यक्रम (२०२१-२२)

| अ.क्र. | कृती/कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | दिवस |
|---|---|---|---|---|
| ०१ | शैक्षणिक सत्र (प्रथम सत्र) | सोमवार दि. ३० ऑगस्ट २०२१ | शनिवार दि. १५ जानेवारी २०२२ | १०५ |
| ०२ | प्रवेश प्रक्रिया | बुधवार दि.१ सप्टेंबर २०२१ | शनिवार दि. १८ सप्टेंबर २०२१ | १४ |
| ०३ | शैक्षणिक दिवस (विषम सत्र) | सोमवार ,दि.२७ सप्टेंबर २०२१ | शनिवार दि. १५ जानेवारी २०२२ | ८३ |
| ०४ | अभिक्रम प्रक्रिया (प्रथम वर्ष प्रवेशित) | सोमवार दि.२० सप्टेंबर २०२१ | शनिवार दि. २५ सप्टेंबर २०२१ | ६ |
| ०५ | प्रथम सत्र अवकाश | सोमवार दि. ०१ नोंव्हेबर २०२१ | शनिवार दि.६ नोंव्हेंबर २०२१ | ०६ |
| ०६ | विषम सत्रांचीची विद्यापीठीय परिक्षा | सोमवार दि.१७ जानेवारी २०२२ | शनिवार दि. ५ फेबुवारी २०२२ | १९ |
| ०७ | शैक्षणिक सत्र (द्वितीय सत्र) | सोमवार दि.१७ जानेवारी २०२२ | मंगळवार दि. ३१ मे २०२२ | १०९ |
| ०८ | शैक्षणिक दिवस (सम सत्र) | सोमवार दि. ७ फेब्रुवारी ,२०२२ | मंगळवार दि.३१ मे,२०२१ | ९० |
| ०९ | शैक्षणिक दिवस (द्वितीय सत्र अवकाश) | बुधवार दि. १ जुन २०२२ | गुरुवार ३० जुन २०२२ | २६ |
| १० | सम सत्रांची विद्यापीठीय परिक्षा तयारी/अशैक्षणिक दिवस | बुधवार दि.१ जुन २०२२ | गुरुवार दि.३० जुन २०२२ | ३० |
| ११ | पुढील शैक्षणिक सत्राचा प्रारंभ | शुक्रवार दि. १ जुलै २०२२ | | |

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज ,पिंजर

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे गॅझेट -२०२१

| अ.क्र. | कृती कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| १) | हिवाळी परीक्षा | सोमवार दि. २८ डिसेंबर 2020 | गुरूवार दि.२८ जानेवारी २१ | ३२ |
| २) | उन्हाळी परीक्षा | मंगळवार दि. २६ मे २०२१ | शुक्रवार दि.२५ जुन २०२१ | ३० |

## सार्वजनिक सुट्टया सत्र २०२१-२२

| अ.क्र. | सण -सुट्या | दिवस | व दिनांक |
|---|---|---|---|
| १) | गणेश चतुर्थी | शुक्रवार | दि.१0 सप्टेंबर २०२१ |
| २) | गौरीपुजन | सोमवार | दि. १३ सप्टेंबर २०२१ |
| ३) | महात्मा गांधी जयंती | शनिवार | दि.0२ ऑक्टोंबर २०२१ |
| ४) | सर्वपित्री अमावस्या | बुधवार | दि.0६ ऑक्टोबर २०२१ |
| ५) | दसरा | शुक्रवार | दि. १५ ऑक्टोंबर २०२१ |
| ६) | ईद-ए-मिलाद | मंगळवार | दि. १९ ऑक्टोंबर २०२१ |
| ७) | गुरुनानक जयंती | शुक्रवार | दि.१९ नोंव्हेंबर २०२१ |
| ८) | ख्रिसमस | शनिवार | दि.२५ डिसेंबर २०२१ |
| ९) | मकरसंक्रांती | शुक्रवार | दि.१४ जानेवारी २०२२. |
| १0) | प्रजासत्ताक दिन | बुधवार | दि.२६ जानेवारी २०२२ |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | शनिवार | दि.१९ फेंब्रुवारी २०२२ |
| १२) | महाशिवरात्री | मंगळवार | दि. 0१ मार्च २०२२ |
| १३) | होळी (दुसरा दिवस) | शुक्रवार | दि. १८ मार्च २०२२ |
| १४) | गुढीपाडवा | शनिवार | दि. 0२ एप्रिल २०२२ |
| १५) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | गुरुवार | दि.१४ एप्रिल २०२२ |
| १६) | गुड फ्रायडे | शुक्रवार | दि. १५ एप्रिल २०२२ |
| १७) | रमझान ईद (ईद-उल-फितर ) | मंगळवार | दि. ३ मे २०२२ |
| १८) | बुध्द पौर्णिमा | सोमवार | दि. १६ मे २०२२ |

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर

**ता.बार्शिटाकळी जि.अकोला.**

**विविध समित्यांचा कार्यभार**

(२०२०-२१) - (२०२१-२२)

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| १) प्रवेश समिती | १) प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | अध्यक्ष |
| | २) प्रा.आर.एन.गावंडे | सदस्य |
| | ३) प्रा.डॉ.वा.वा.भगत | सदस्य |
| २) वेळापत्रक समिती | १) डॉ.प्रा.एम.के.फडणीस | अध्यक्ष |
| | २) प्रा.डॉ.ए.के.ठाकरे | सदस्य |
| | ३) प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | सदस्य |
| ३) कृती समिती | १) डॉ.व्ही.सी.खारोडे (प्राचार्य) | अध्यक्ष |
| | २) प्रा.डॉ.वा.वा.भगत | सदस्य |
| | ३) प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | सदस्य |
| | ४) श्री डी.डी.बाकल | सदस्य |
| ४) वार्षिक नियोजन समिती | १) प्रा.एस.एम.मनवर | अध्यक्ष |
| | २) प्रा.आर.एन.गांवडे | सदस्य |
| | ३) डॉ.एन.बी.सपकाळ | सदस्य |
| ५) परिक्षा समिती | १) प्रा.डॉ.ए.के.ठाकरे | अध्यक्ष |
| | २) प्रा.डॉ.वा.वा.भगत | सदस्य |
| | ३)प्रा.एस.एम.मनवर | सदस्य |
| | ४) श्री सं.प्र. गिरी | सदस्य |
| ६) वार्षिकांक तथा सांस्कृतिक घडामोडींबाबत प्रसिध्दी समिती | १) प्रा.डॉ.एम.के.फडणीस | संपादक |
| | २) प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | उपसंपादक |
| | ३) करुणा अंभोरे | संपादन साहाय्य |

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर

## ता.बार्शिटाकळी जि.अकोला.

## सत्र २०२०-२१ व २०२१-२२

## विविध समित्यांचा कार्यभार

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| ७) नॅक समिती (महाविद्यालय) | १) डॉ.व्ही.सी.खारोडे (प्राचार्य) | अध्यक्ष |
| | २) प्रा.आर.एन.गावंडे | सदस्य |
| | ३) प्रा.डॉ.ए.के.ठाकरे | सदस्य |
| | ४) श्री या.वि.देशमुख | सदस्य |
| | ५) श्री सं.प्र.गिरी | सदस्य |
| ८)आय.क्यु.ए.सी.समिती (महाविद्यालय) | १) डॉ.व्ही.सी.खारोडे (प्राचार्य) | अध्यक्ष |
| | २) प्रा.आर.एन.गावंडे | समन्वयक |
| | ३) प्रा.डॉ.पी.एम.तायडे | सदस्य |
| ९) यु.जी.सी.पुरस्कृत विकास निधी उपयोजन | १) डॉ.व्ही.सी.खारोडे (प्राचार्य) | अध्यक्ष |
| | २) डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | समन्वयक |
| | ३) प्रा.डी.डी.बाकल | सदस्य |
| १०) करिअर ओरिएंटेड कोर्स | १) डॉ.व्ही.सी.खारोडे (प्राचार्य) | अध्यक्ष |
| | २) प्रा.आर.एन.गावंडे | समन्वयक |
| | ३) प्रा.या.वि.देशमुख | सदस्य |
| ११) सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा समिती | १) प्रा.डॉ.एम.के.फडणीस | अध्यक्ष |
| | २) प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | सदस्य |
| | ३) डॉ.एन.बी.सपकाळ | सदस्य |
| | ४) प्रा.डॉ.रेखा एस.काळबांडे | महिला सदस्य |
| १२) विद्यार्थी विकास योजना समिती | १) प्रा.डॉ.रेखा.एस.काळबांडे | समन्वयक |
| | २) प्रा.डॉ.ए.व्ही.वाहुरवाघ | सदस्य |
| | ३)श्री देवानंद डी.बाकल | सदस्य |



# सामुदायिक प्रार्थना
## प्रार्थनाष्टक

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

है प्रार्थना, गुरुदेव से, यह स्वर्गसम संसार हो ।
अति उच्चतम जीवन बनें,परमार्थमय व्यवहार हो ।।
ना हम रहे अपने लिए,हमको सभी से गर्ज है ।
गुरुदेव यह आशीष दे, जो सोचने का फर्ज है ।। १ ।।
हम हो पुजारी तत्व के,गुरुदेव के आदेश के ।
सच प्रेम के, नित नेम के ,सध्दर्म के सत्कर्म के ।।
हो चीढ झूठी राह की, अन्याय की अभिमान की ।
सेवा करन दो दास की, पर्वा नही हो जान की ।। २।।
छोटे न हो हम बुध्दि से, हो विश्वमय से ईशमय ।
हो राममय अरु कृष्णमय , जगदेव में जगदीशमय ।।
हर इंद्रियों पर ताबा कर, हम बीर हो अति धीर हो ।
उज्वल रहे सरसे सदा ,निजधर्म रत खंबीर हो ।। ३ ।।
यह डर भी जाता रहे, मनबुध्दि का इस देह का ।
निर्भय रहे हम कर्म में, परदा खुला कर स्नेह का ।।
गाते रहे प्रभू-नाम,पर प्रभू तत्व पाने के लिए ।
हो ब्रम्हाविद्या का उदय,यह जी तराने के लिए ।। ४ ।।

अति शुध्द हो आचार से, तन-मन हमारा सर्वदा ।
अध्यात्म की शक्ती हमें, पल भी नही करके जुदा ।।
इस अमर आत्मा का हमें, हर श्वासभर से गम रहे ।
गर मौत भी हो आयगी, सुख-दुख हम में सम रहें ।। ५।।
गुरुदेव । तेरी अमर ज्योति का हमें निज ज्ञान हो ।
सतज्ञान ही तू है सदा, यह विश्वभर में ध्यान हो ।
तुझमें नही है पंथ भी ,ना जात भी ना देश भी ।
तू है निरामय एकरस,है व्याप्त भी अरु शेष भी ।। ६ ।।
गुण-धर्म दुनिया में बढे,हर जीव से कर्तव्य हो ।
गंभीर हो सबके हृदय,सचज्ञान का वक्तव्य हो ।।
यह दूर हो सब भावना,'हम नीच है अस्पृश्य है ।
हर जीव का हो शुध्द मन,जब कर्म उनके स्पृश्य है ।।७।।
हम भिन्न हो इस देह से, पर तत्व से सब एक हो ।
हो ज्ञान सबसे एक ही, जिससे मनुज नि:शंक हो ।।
तुकडया कहे ऐसा अमरपद,प्राप्त हो संसार में ।
छोडे नही घरबार पर हो मस्त गुरु चरणार में ।। ८ ।।

# खरा तो एकची धर्म



खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।
जगी जे दीन अती पतीत
जगी जे दीन पद-दलित
तया जाऊन उठवावे । जगाला प्रेम अर्पावे ।। धृ ।।

सदा जे आर्त अती विकल
जयांना गांजिता सकल
तया जाऊन हसवावे । जगाला प्रेम अर्पावे ।। १ ।।

कुणा ना व्यर्थ शिणवावे
कृणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधू मानावे । जगाला प्रेम अर्पावे ।। २।।

प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे । जगाला प्रेम अर्पावे ।। ३ ।।

असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे । जगाला प्रेम अर्पावे ।। ४ ।।
खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे .......

\- साने गुरुजी




अकोला एमआयडीसी येथे आयोजित उद्योग प्रदर्शनीला डॉ.पकंज तायडे,डॉ.ए.के.ठाकरे समवेत विद्यार्थी



वृक्षारोपण करतांना डॉ.नानासाहेब सपकाळ तथा रासेयो प्रमुख आर.एन. गावंडे, कर्मचारीवृंद



मराठी भाषा गौरवदिना निमित्त मराठी ग्रंथ प्रदर्शनीत ग्रंथाची माहिती संकलन करतांना विद्यार्थी



नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करतांना प्राध्यापक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी



ग्रंथपाल डॉ.रेखा काळबांडे ग्रंथ परिषदेत ग्रंथ निरिक्षण करतांना



पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ



अष्टपैलू विद्यार्थी राहुल सावंत चे अभिनंदन करतांना प्राध्यापक वृंद



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी श्रीमती मंगलाबाई सुनील घनघाव यांना भेटवस्तु देतांना




लोकमान्य टिळक पुण्यतिथी तथा अण्णाभाऊ साठे जयंती
कार्यक्रमामध्ये अध्यक्षीय भाषण करतांना प्राचार्य डॉ. व्ही.सी.खारोडे



डॉ.पकंज तायडे यांनी सार्वजनिक वाचनालयला कॉम्प्युटर दिल्या प्रित्यर्थ
अभिनदंन करतांना मा.जितेंद्र पापडकर,जिल्हाधिकारी ,अकोला.



रा.से.यो अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिना निमित्त
विद्यार्थ्यांचे प्रबोधन करतांना डॉ.वासुदेव भगत



डॉ.अनिल ठाकरे पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना पदवी वितरण करतांना




रा.से.यो प्रमुख प्रा.रामकृष्ण गावंडे आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त विद्यार्थ्यांना व
शिक्षक –शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना योग शिकवितांना



मराठी विभागाच्या वतीने आयोजित भाषा स्पर्धेत
प्राचार्य डॉ.व्ही.सी.खारोडे कु.रोशनी जयस्वाल चे परितोषिक देतांना

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज

पिंजर, ता.बार्शिटाकळी जि.अकोला.